POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

# मराठी दैनिक मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकारी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-१९२ ● मुंबई, शुक्रवार, १३ फेब्रुवारी २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

# बारावीच्या पहिल्या पेपरला कॉपीचा सुळसुळाट, कुठे किती कारवाई

**बारावीच्या पहिल्याच पेपरला राज्यातील 'कॉपीमुक्त' अभियानाचे वाभाडे निघाले आहेत. छत्रपती संभाजीनगरमधील जैतापूर केंद्रावर सामूहिक कॉपी झाल्याचे उघड झाले असून १९ पर्यवेक्षकांवर कारवाई करण्यात आली आहे. अमरावती विभागात सर्वाधिक २२ विद्यार्थी पकडले गेले आहेत.**

**■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची बारावीची परीक्षा मंगळवारपासून सुरू झाली. राज्य सरकारने संपूर्ण राज्यात कॉपीमुक्त अभियान राबवण्याचा गाजावाजा केला आहे. बारावीच्या पहिल्याच इंग्रजीच्या पेपरला या अभियानाचे अक्षरशः वाभाडे निघाले आहेत. राज्यात एकूण ४२ विद्यार्थ्यांवर कारवाई झाली आहे. तसेच छत्रपती संभाजीनगरमधील सामूहिक कॉपीच्या प्रकाराने शिक्षण विभागाच्या विश्वासार्हतेवर मोठे प्रश्नचिन्ह उभे केले आहे.




कन्नड तालुक्यातील जैतापूर येथील राष्ट्रीय उच्च माध्यमिक विद्यालयात परीक्षेच्या गांभीयार्ला हरताळ फासण्यात आला. भरारी पथकाला मिळालेल्या माहितीनुसार, या केंद्रावर विद्यार्थी कोणत्याही भीतीशिवाय एकमेकांच्या उत्तरपत्रिकांमधून उत्तरे उतरवून काढत होते. विशेष म्हणजे, ज्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचा धाक दाखवून पारदर्शकतेचा दावा केला जातो, त्याच कॅमेऱ्यांमध्ये हा सर्व प्रकार कैद झाला. विद्यार्थी एकमेकांशी बोलताना, पेपरची अदलाबदल करताना आणि पर्यवेक्षकांच्या उपस्थितीतच कॉपी करताना स्पष्ट दिसत आहेत.

**फौजदारी गुन्हा दाखल करण्याच्या हालचाली सुरू**

या प्रकरणाची माहिती मिळताच जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आक्रमक पवित्रा घेतला. केवळ विद्यार्थ्यांवर कारवाई न करता, या प्रकाराला खतपाणी घालणाऱ्या यंत्रणेवरच त्यांनी प्रहार केला आहे. कर्तव्यात कसूर केल्याचा ठपका ठेवत केंद्रसंचालकासह तब्बल १९ पर्यवेक्षकांवर तात्काळ कारवाई करण्यात आली आहे. परीक्षा केंद्रावरील जुन्या सर्व कर्मचाऱ्यांची हकालपट्टी करून त्या ठिकाणी जिल्हा प्रशासनाने नियुक्त केलेल्या नवीन क्लीन स्टाफची नियुक्ती करण्यात आली आहे. या प्रकरणात दोषी आढळणाऱ्या कर्मचाऱ्यांवर केवळ विभागीय चौकशीच नाही, तर फौजदारी गुन्हा दाखल करण्याच्या हालचालीही सुरू आहेत.

**अमरावती अव्वल, पुणे दुसऱ्या स्थानी**

राज्यातील कॉपी बहाद्दरांची आकडेवारी पाहता शिक्षण विभागात चिंतेचे वातावरण आहे. अमरावती विभागात सर्वाधिक २२ विद्यार्थी कॉपी करताना पकडले गेले. ग्रामीण भागात कॉपी पुरवणाऱ्या टोळ्या सक्रिय असल्याचे यावरून स्पष्ट होते. पुणे विभागात १० विद्यार्थ्यांवर कारवाई करण्यात आली. तसेच इतर विभाग उर्वरित १० प्रकरणे राज्याच्या इतर भागांत विखुरलेली आहेत.

**पालक आणि शिक्षण तज्ज्ञांमध्ये संताप**

एकीकडे प्रामाणिकपणे अभ्यास करणारे विद्यार्थी आणि त्यांचे पालक कडक शिस्तीचे स्वागत करत आहे. तर दुसरीकडे जैतापूरसारख्या ठिकाणी होणाऱ्या सामूहिक कॉपीमुळे गुणवत्तेवर अन्याय होत असल्याची भावना व्यक्त होत आहे. केंद्रावर सीसीटीव्ही असूनही जर पर्यवेक्षक गप्प बसत असतील, तर हे अभियान केवळ कागदावरच आहे का? असा संतप्त सवाल विचारत आहेत.

जैतापूरची घटना ही इतर केंद्रांसाठी इशारा आहे. परीक्षा केंद्राच्या शंभर मीटर परिसरात कोणत्याही अनधिकृत व्यक्तीला प्रवेश दिला जाणार नाही आणि फिरते पथक प्रत्येक हालचालीवर लक्ष ठेवून असेल, असे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी स्पष्ट केले.




## कॉपीमुक्त अभियानाचा फज्जा!

### बीडमधील परीक्षा केंद्रावर पालकांकडून कॉपीचा पुरवठा...

बीडः बारावी बोर्ड परीक्षेचा पहिला पेपर काल झाला. बीडमधील चौसाळा येथील महाविद्यालयात विद्यार्थ्यांना कॉपी पुरवल्याचा ड्रोन व्हिडिओ शिक्षण अधिकाऱ्यांच्या कॅमेऱ्यात कैद झाल्याची बातमी समोर आली आहे. तसेच, काही पालक खिडक्यांमधून चढून कॉपी पुरवताना दिसले. हा ड्रोन व्हिडिओ समोर आल्यानंतर परिसरात एकच खळबळ उडाली. या प्रकरणाचं गांभीर्य लक्षात घेऊन जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित लोकांविरुद्ध गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले आहेत.

**कठोर कारवाई करण्याचे निर्देश :** शिक्षण विभागाने हा व्हिडिओ जारी केला असून त्यात परीक्षेच्या वेळी कोणत्याही प्रकारची बाहेरून मदत किंवा साहित्य पुरवणे हे नियमांचे उल्लंघन असल्याचं स्पष्ट केले आहे. असं असूनही, काही लोक नियमांकडे दुर्लक्ष करून त्यांच्या मुलांना कॉपी पोहोचवताना दिसले आहेत. या संपूर्ण प्रकरणाचं गंभीर्य लक्षात घेऊन जिल्हा दंडाधिकाऱ्यांनी अशा लोकांवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत आणि थेट एफआयआर नोंदवण्याचे आदेश दिले आहेत.

**प्रशासकीय देखरेखीबाबत अनेक प्रश्न उपस्थित :** आता प्रशासन या प्रकरणात किती लवकर कारवाई करते आणि संबंधित नागरिकांवर प्रत्यक्षात कायदेशीर कारवाई होते की नाही? हे पाहणं महत्त्वाचं ठरेल. या घटनेमुळे परीक्षा व्यवस्थेच्या काटेकोरपणा आणि या काळात प्रशासकीय देखरेखीबाबत अनेक प्रश्न उपस्थित होताना दिसून येत आहेत. या ड्रोन व्हिडिओच्या आधारे, परीक्षा केंद्राचे सीसीटीव्ही फुटेज महसूल अधिकारी आणि शिक्षण अधिकाऱ्यांनी रात्री तपासले. जिल्हा दंडाधिकारी विवेक जॉन्सन यांनी या प्रकरणात शिक्षक, केंद्रप्रमुख आणि इतर संबंधित लोकांविरुद्ध गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले आहेत.

### मराठवाड्यात कॉप्यांचा सुळसुळाट

मराठवाड्यातील काही जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात कॉपी प्रकरणे पुढे आली असून छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातही कॉप्यांचा सुळसुळाट पाहायला मिळाला. राष्ट्रीय उच्च माध्यमिक विद्यालय, जैतापूर (ता. कन्नड) येथे इयत्ता 12 वीच्या इंग्रजी पेपरदरम्यान मोठा गैरप्रकार उघडकीस आला. परीक्षा केंद्रावरील उउळश फुटेज आणि उत्तरपत्रिकांच्या झेरॉक्स प्रतींच्या आधारे तब्बल 19 पर्यवेक्षक आणि केंद्रसंचालकांवर कठोर कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे. या घटनेमुळे शिक्षण क्षेत्रात एकच खळबळ उडाली आहे. येथील दक्षता समितीचे अध्यक्ष तथा छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित आणि विभागीय बोडार्चे अध्यक्ष अनिल साबळे यांच्या आदेशानुसार संबंधितांवर कारवाई करण्यात आली. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) श्रीमती अश्विनी लाठकर यांच्या नेतृत्वाखाली भरारी पथकाने संपूर्ण तपास पूर्ण केला.

# बारवीच्या परीक्षेत कॉप्यांचा सुळसुळाट

## शिक्षणमंत्री संतापले, म्हणाले, केंद्र प्रमुख अन पर्यवेक्षकांवर कारवाई

**■मुंबई। प्रतिनिधी,**

राज्यात १२ वी बोर्ड परीक्षेला १० फेब्रुवारीपासून सुरुवात झाली असून राज्य सरकारच्या कॉपीमुक्त अभियानास पहिल्याच दिवशी हरताळ फासण्यात आल्याचं पाहायला मिळालं. विशेष म्हणजे, परीक्षा केंद्रावरील अधिकारी आणि पर्यवेक्षक विद्यार्थ्यांना कॉपी पुरवत असल्याचे सीसीटीव्हीत कैद झाले असून पालकांकडून संताप व्यक्त होत आहे.




### १९ जणांविरुद्ध कठोर कारवाई प्रस्तावित

या प्रकरणात परीक्षा केंद्र संचालकासह एकूण १९ जणांविरुद्ध कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे. जिल्हा परिषद कर्मचारी असलेल्या पर्यवेक्षक शिक्षक आणि तिथल्या पथकातील अधिकाऱ्यांविरुद्ध निलंबनाचे प्रस्ताव दाखल करण्यात आले आहेत. इतर संस्थांशी संबंधित कर्मचाऱ्यांवर संस्थांतर्गत शिस्तभंगात्मक तसेच कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

यापकरणी, जिल्ह्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी कारवाईचे निर्देश दिले असताना आता, शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनीही संबंधित केंद्रांची मान्यता रद्द करण्यात येईल, तसेच पर्यवेक्षक आणि केंद्र अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाईल, असे स्पष्ट केले आहे.

परीक्षा केंद्रातील शाळांना सीसीटीव्ही लावणे इतर सुविधा, पाणी, बसेस वेळेवर पोहचल्या पाहिजे यांसह सर्वच निर्देश दिले होते. तरीही १२ वी परीक्षांत कॉपीच्या घटना घडल्याचं दिसलं. त्यामुळे, कॉपीच्या घटना समोर आलेल्या केंद्रावर रद्द बातलची कारवाई केली जाईल, यापुढे परवानगी दिली जाणार नाही. कॉपी करणाऱ्यांसह केंद्र प्रमुख आणि पालकांवरही कारवाई केली जाईल. ज्या शाळांनी पालन केले नाही, त्यांच्यावर कारवाई केली जाईल अशी माहिती शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी दिली.

राज्यात बारावीच्या परीक्षा प्रगती पथावर आहेत, सर्व विद्यार्थ्यांना आवाहन केलं होतं की, निर्भीडपणे परीक्षेला सामोरे जा. गुरुजींनी ज्ञान दानाचे काम केलं आहे. मुख्यमंत्री यांनी मुलांना सूचना दिल्या होत्या, त्यानुसार कॉपीमुक्त परीक्षा अभियान राबविले जात आहे.

त्यामध्ये शिक्षण विभागाची जबाबदारी आहे. महसूल विभाग, गृह, ग्रामविकास विभागाचे सहकार्य घेतले जाते, आढावा बैठक घेतली जाते. मात्र, जिथं कॉपीचे प्रकार घडले तिथे कारवाई करण्यात येईल, असे दादा भुसेंनी स्पष्ट केले.

## गावठी भाषा, मॅनर्सलेस लोक... म्हणत मराठीचा अपमान

# फिझिक्स वालाच्या शिक्षकाला मनसेने दिला चोप, व्हिडीओ व्हायरल

**■मुंबई। प्रतिनिधी,**

मराठी भाषेचा अपमान करणाऱ्या नाशिकमधील खासगी कोचिंग क्लासच्या एका शिक्षकाला महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या कार्यकर्त्यांनी चांगलाच चोप दिला. येत्या आठ दिवसांत जर अमराठी शिक्षकांना परत पाठवले नाही तर मनसेस्टाईलचा हिसका दाखवला जाईल, असा दमही देण्यात आला.

शहरातील शरणपूर रोड परिसरातील फिझिक्स वाला या खासगी क्लासमध्ये हा प्रकार घडला. माहितीनुसार, क्लासमधील तीन ते चार विद्यार्थी आपसात मराठीत बोलत होते. त्यावेळी एका शिक्षकाने 'मॅनर्सलेस लोग है, गावठी भाषा में बात करते है' असे म्हणत मराठीचा अपमान केला. एक विद्यार्थी त्याच्या वडिलांशी मराठीत बोलत असताना त्यालाही



'ये कौन सी भाषा है, हिंदी में बात करो' असे सांगण्यात आले. त्यामुळे चिडलेल्या विद्यार्थ्यांनी तडक नाशिकमधील मनसेचे 'राजगड' कार्यालय गाठले. त्यानंतर मनसेचे कार्यकर्ते थेट क्लासमध्ये घुसले.

"इथे कमवतो, महाराष्ट्रात पोट भरतो तरी मराठीचा अपमान करतो...मराठीला गावठी बोलतोस लाज नाही वाटत का तुला..." असे म्हणत सदर शिक्षकाला चोप देत मनसे कार्यकर्त्यांनी जाब विचारला. तसेच, जर येत्या आठ दिवसांत अमराठी शिक्षकांना परत पाठवले नाही तर मनसेस्टाईलचा हिसका दाखवला जाईल, अशी धमकीही देण्यात आली. या क्लासमध्ये बहुतेक शिक्षक परप्रांतीय असून, हिंदी भाषेचा वापर सक्तीने केला जात असल्याचेही सांगितले जात आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना अभ्यासातही अडचणींचा सामना करावा लागतो. पण, लाख-दोन लाख फी भरल्यामुळे विद्यार्थी-पालक काही बोलत नाहीत. विद्यार्थ्यांना मराठी बोलण्यास प्रतिबंध केला जातो. काही विद्यार्थ्यांना या शिक्षकांचे हिंदी समजत नसल्याने त्याबाबत तक्रार केली असता, शिकायचे असेल तर हिंदीत शिका, अशी अरेरावी केल्याचेही मनसेचे म्हणणे आहे.

# राज्यात 'या' विभागात कडाक्याचं तापमान वाढण्याची शक्यता



**■मुंबई। प्रतिनिधी,**

राज्यात १२ फेब्रुवारी रोजी प्रामुख्याने कोरडं वातावरण राहण्याची शक्यता आहे. थंडावा कमी जाणवेल, तसेच अधिकचा सूर्यप्रकाश असेल. यामुळे काही प्रमाणात उकाडा जाणवण्याची शक्यता आहे. काही भागांत अल्पकालीन उन्हाळ्यासरखी स्थिती अनुभवता येऊ शकते. जाणून घेऊयात १२ फेब्रुवारी रोजी हवामानाचा एकूण अंदाज.

- **कोकण :** कोकण विभागातील मुंबई, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्गमध्ये हवामान कोरडं रहील, तसेच सकाळी हलक्या प्रमाणात थंडावा जाणवेल. तसेच दुपारी उष्णता वाढण्याची शक्यता आहे. समुद्रकिनारी हलके वारे वाहतील असा अंदाज आहे.
- **पश्चिम महाराष्ट्र :** पश्चिम महाराष्ट्रात कोरडे हवामान राहण्याची शक्यता आहे. पश्चिम महाराष्ट्रातील पुण्यात 34 अंश सेल्सिअस तापमान राहील. सांगली आणि कोल्हापूर भागात काही प्रमाणात उकाडा वाढण्याची शक्यता आहे. सकाळी आणि रात्री थंडावा, तर दिवसा उन्हाला तडाखा बसण्याची शक्यता आहे.
- **मराठवाडा :** छत्रपती संभाजीनगरातील जालना, बीड, परभणी, नोंदडमध्ये तापमानात लक्षणीय वाढ होण्याची शक्यता आहे. छत्रपती संभाजीनगरात तापमानात काहीअंशी प्रमाणात वाढ होण्याची शक्यता आहे. हवामान कोरडं आणि उष्ण राहील असा अंदाज आहे.
- **विदर्भ :** विदभार्तील नागपूर, अमरावती, यवतमाळ आणि वर्धा या जिल्ह्यांमध्ये उष्णता अधिक जाणवण्याची शक्यता आहे. हवामान पूर्ण कोरडे जाणवे आणि दुपारी तीव्र उष्णता अनुभवता येईल, पण रात्री थंडावा जाणवण्याची शक्यता आहे.

# नाशिकमध्ये ज्योतिषाकडूनच ७२ लाखांचा चुना

## शेअर मार्केटमधून मोठ्या परताव्याचं आमिष दाखवलं

**■नाशिक। प्रतिनिधी,**

शेअर ट्रेडिंगमध्ये भरघोस परतावा मिळवून देण्याचे आमिष दाखवत नाशिकमधील एका ज्योतिषाने गुंतवणूकदाराला तब्बल ७२ लाख रुपयांना गंडा घातल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. शरणपूर रोड परिसरात 'अंजनिय ज्योतिष केंद्र' चालवणाऱ्या सचिन देशमुख याच्याविरोधात फसवणुकीचा गुन्हा नाशिक सायबर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला असून, पोलीस पुढील तपास करत आहेत.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, सचिन देशमुख याने स्वतःला अनुभवी ज्योतिष आणि शेअर बाजारातील तज्ज्ञ म्हणून सादर केले. गुंतवणूकदारांचा विश्वास संपादन करण्यासाठी त्याने सुरुवातीला ऑनलाइन मीटिंग्स, झूम कॉल्स तसेच कार्यालयात प्रत्यक्ष भेटी घेतल्या.




"शेअर मार्केटमध्ये योग्य वेळी गुंतवणूक केल्यास मोठा नफा निश्चित मिळतो," असे सांगत त्याने गुंतवणूकदारांना आकर्षित केले.

सायबर पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, शेअर ट्रेडिंग, क्रिप्टो किंवा कोणत्याही गुंतवणुकीबाबत भरघोस परताव्याचे आमिष दाखवणाऱ्यांपासून सावध राहावे. अधिकृत नोंदणी, परवाने आणि व्यवहारांची खातरजमा केल्याशिवाय गुंतवणूक करू नये. या प्रकरणामुळे नाशिकमध्ये खळबळ उडाली असून, तपासातून आणखी धक्कादायक बाबी समोर येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

### सुरुवातीच्या काही गुंतवणुकीवर नाममात्र परतावा

विश्वास अधिक दृढ करण्यासाठी त्याने सुरुवातीच्या काही गुंतवणुकीवर नाममात्र परतावा दिला. त्यामुळे गुंतवणूकदारांचा विश्वास वाढला आणि त्यांनी टप्प्याटप्प्याने मोठ्या रकमा गुंतवण्यास सुरुवात केली. मात्र, काही काळानंतर परतावा देणे अचानक थांबवण्यात आले. पैसे परत मागितल्यावर टाळाटाळ, विविध कारणे आणि खोटी आश्वासने देण्यात आल्याचे तक्रारीत नमूद आहे.

### ७२ लाख रुपयांची आर्थिक फसवणूक

आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच संबंधित गुंतवणूकदारांनी सायबर पोलिसांकडे धाव घेत तक्रार दाखल केली. प्राथमिक तपासात एकूण ७२ लाख रुपयांची आर्थिक फसवणूक झाल्याचे समोर आले आहे. त्यानुसार सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपीने गुंतवणूकदारांकडून घेतलेली रक्कम कुठे व कशी वळवली, इतर बळी आहेत का? याचा तपास सुरू आहे.

# '२४ वर्षीय तरुणाची पुण्यात हत्या, भाषेच्या वादातून हत्या झाल्याचा दावा'

## पुण्यात पश्चिम बंगालच्या युवकाची हत्या झाल्यानंतर ममता बॅनर्जींची पोस्ट

**■पुणे। प्रतिनिधी,**

पुण्यात एका २४ वर्षीय तरुणाची हत्या करण्यात आल्याची बातमी समोर आली होती. या हत्येप्रकरणी आता पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी आपलं दुःख व्यक्त केलं आहे. त्यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत त्यांनी आरोप केला की, तरुणाला त्याची ओळख आणि त्याच्या मूळ ठिकाणाच्या आधारे लक्ष्य करण्यात आलं, त्याचा पाठलाग करण्यात आला, छळ करण्यात आला आणि अखेर त्याची हत्या करण्यात आली.



मिळालेल्या माहितीनुसार, मृत तरुण हा पुण्यातील एका खाजगी कंपनीत कार्यरत होता आणि तो त्याच्या तीन भावांसोबर शिक्रापूर पोलीस स्टेशन हद्दीतील एका खोलीत राहत होता. दोन दिवसांपूर्वी कोरेगाव परिसरात एका हॉटेलच्या मागे त्याचा रक्तबंबाळ अवस्थेत मृतदेह आढळला.

पोलिसांच्या तपासात समोर आलं की, घटनेच्या दिवशी पीडित तरुण त्याच्या कंपनीत कामासाठी गेला नव्हता आणि दुपारी ३ वाजल्यापासून त्याने मद्यपान केलं. त्यावेळी, दारू पित असताना त्याच्या कोणासोबत वाद झाला असावा आणि त्यानंतर त्याची हत्या करण्यात आली असावी, असा संशय व्यक्त केला जात आहे. दरम्यान, शिक्रापूर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ निरीक्षक दीपरत्न गायकवाड यांनी या प्रकरणाबाबत माहिती देताना सांगितलं की, या घटनेतील दोन संशयितांची ओळख पटवण्यात आली असून त्यांना लवकरच ताब्यात घेतलं जाईल.

### पुण्यातील ह्या घटनेबद्दल एक्सवरील पोस्टमध्ये ममता बॅनर्जी काय म्हणाल्या?

"मला धक्का बसला आहे, राग आला आहे आणि शब्दांत सांगता येणार नाही असं दुःख झालं आहे. महाराष्ट्रातील पुण्याच्या पुरुलिया जिल्ह्यातील बंदवान परिसरात २४ वर्षीय स्थलांतरित कामगार सुकेन महतो याची क्रूर हत्या अत्यंत अमानुष आणि निषेधार्ह आहे. तो त्याच्या कुटुंबाचा एकमेव कमवता सदस्य होता." ही घटना स्पष्टपणे द्वेषपूर्ण गुन्ह्याची असल्याचे दिसून येते. एका तरुणाला त्याची भाषा, ओळख आणि त्याच्या मुळांमुळे लक्ष्य करण्यात आलं, त्याचा पाठलाग करण्यात आला, छळ करण्यात आला आणि त्याची हत्या करण्यात आली. हा अशा वातावरणाचा परिणाम आहे जिथे परदेशी किंवा बाहेरील लोकांबद्दल द्वेष वाढवला जात आहे आणि निष्पाप लोकांना लक्ष्य केलं जात आहे. मी गुन्हेगारांना तात्काळ अटक करण्याची आणि त्यांना कठोर शिक्षा देण्याची मागणी करते. मी सुकेनच्या कुटुंबाला सांगू इच्छितो की या अकल्पनीय दुःखाच्या वेळी संपूर्ण बंगाल त्यांच्यासोबत उभा आहे. न्याय मिळवून देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील.

### मुलुंड स्टेशन परिसरातील एस व्ही पी मार्ग क्लिअर



**■मुंबई । प्रतिनिधी,**

मुलुंड (पश्चिम) येथील सरदार वल्लभभाई पटेल मार्गावरील ६१ अनधिकृत बांधकामे मुंबई महानगरपालिकेच्या ह्यटीह्ण विभागाकडून बुधवारी ११ फेब्रुवारी २०२६ रोजी कारवाई करण्यात आली. या कारवाईनंतर सुमारे ११०० चौरस मीटर परिसर मोकळा झाला. यामुळे मुलुंडचा एस व्हि पी मार्ग क्लिअर झाला आहे. मुंबई महापालिका उपायुक्त (परिमंडळ-६) संतोषकुमार धोंडे यांच्या देखरेखीत, सहायक आयुक्त (टी विभाग) योगिता कोल्हे यांच्या नेतृत्वात ह्यटीह्ण प्रशासकीय विभाग अंतर्गत कार्यरत विविध विभागांकडून संयुक्तपणे ही कारवाई हाती घेण्यात आली होती.



## संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# कॉपीमुक्त की कॉपीयुक्त?



महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची बारावीची परीक्षा मंगळवारपासून सुरू झाली. यंदाची परीक्षा कॉपीमुक्त करण्याची दवंडी मंडळाने दरवर्षीप्रमाणे यावेळीही राज्यभर पिटली होती. परीक्षा केंद्रांवर भरारी पथकांची तैनाती, प्रश्नपत्रिका सुरक्षिततेसाठी कडक उपाययोजना, वेळेवर वितरण, सीसीटीव्ही देखरेख आणि पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आल्याचे सांगत कॉपी बहाद्दरांना आळा घालण्याचा छातीठोक दावा मंडळाने केला होता. परीक्षेपूर्वी मंडळाने कॉपीमुक्त अभियानाअंतर्गत जनजागृती सप्ताहदेखील राबवल्याचे सांगितले होते. प्रत्यक्षात इंग्रजी विषयाच्या पहिल्याच पेपरपासूनच कॉपीमुक्तऐवजी कॉपीयुक्त परीक्षेचा श्रीगणेशा झाल्याचे चित्र राज्यातील अनेक जिल्ह्यातल्या परीक्षा केंद्रांवर दिसले. बारावीच्या परीक्षेत ९ विभागांमध्ये एकूण ४२ कॉपीची प्रकरणे समोर आली असून, सर्वाधिक प्रकरणे छत्रपती संभाजीनगर विभागात आढळली आहेत. याशिवाय पुणे ८, अमरावती २, नाशिक ३, लातूर १ यात कॉपीची प्रकरणे आढळली आहेत. छत्रपती संभाजी नगरच्या जैतापूर तालुक्यातील परीक्षा केंद्रावरील सामूहिक कॉपीच्या प्रकाराने शिक्षण विभागाच्या विश्वासार्हतेवर मोठे प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. या प्रकारातून मंडळाच्या कॉपीमुक्त अभियानाचे अक्षरशः धिंडवडे निघाले आहेत, असे म्हटले तर चुकीचे ठरणार नाही. विद्यार्थ्यांच्या करियरला नवे वळण देणाऱ्या परीक्षा म्हणून दहावी-बारावी बोर्डाच्या परीक्षांना अनन्यसाधारण महत्त्व असते. आजच्या स्पर्धात्मक युगात पाल्य दहावी-बारावीत पोहोचण्याआधीच पालकांची तयारी सुरू झालेली असते. आपला पाल्य कुठल्या विषयात चांगला व कमकुवत आहे, त्यानुसार त्याच्याकडून कुठल्या विषयाची तयारी करून घ्यायची, करियर निवडीसाठी त्याने कुठल्या विषयात चांगले गुण मिळवणे महत्त्वाचे आहे, त्यांना कुठल्या क्लासला पाठवायचे? पालकांच्या डोक्यात असे एक ना अनेक विषयांचे काहूर माजलेले असते. विद्यार्थीदेखील वर्षभर घासून मेहनत करतात. सर्व मजामस्ती विसरून वर्षभर पुस्तक डोळ्यासमोर धरलेले असते. त्यामुळे कधी एकदा परीक्षा देतो आणि या जाचातून मुक्त होतो, अशी अवस्था काही विद्यार्थ्यांची झालेली असते. परीक्षेच्या काळातही परीक्षा केंद्रांवर वेळेत पोहोचण्यासाठी पालक व विद्यार्थ्यांची गडबड चाललेली असते, पालकांच्या दुचाकीवर पाठीमागे बसून शेवटच्या क्षणी विद्यार्थी वही-पुस्तक हातात घेवून वाचताना दिसतात, परीक्षा केंद्र तपासले ना?, खोली क्रमांक कुठला? प्रवेशपत्र घेतले ना? अशी पालकांकडून सातत्याने विचारणा होत असते. अभ्यास करूनही पेपर सोपा असेल की अवघड अशी विद्यार्थ्यांच्या मनात चलबिचल चाललेली असते अशा सर्व मानसिक घालमेलीतून, अस्वस्थतेतून ही परीक्षा दिली जाते. परंतु, जेव्हा जीवतोड मेहनत, अभ्यास करून पेपर दिल्यानंतर आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे तो चांगला गेल्यानंतर जेव्हा कॉपी आणि पेपरफुटीच्या बातम्या विद्यार्थी, पालकांवर येवून आदळतात, तेव्हा त्यांची काय अवस्था होत असेल. राज्यात दहावी-बारावीच्या परीक्षेदरम्यान होणाऱ्या कॉपीच्या घटना रोखण्यासाठी शिक्षण मंडळाने परीक्षा केंद्राच्या वर्गखोल्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याचे पत्रक काढले होते. परंतु, शाळांना गेल्या १२ वर्षांत कोणताही निधी न देता शिक्षण विभाग एवढा आर्थिक भार कसा टाकू शकते, असा प्रश्न उपस्थित करीत शिक्षण मंडळ सीसीटीव्ही सक्ती करत असेल, तर त्यांनी आमच्या शाळा केंद्र म्हणून घेऊ नये, अशी भूमिका संस्थाचालकांच्या संघटनांनी घेत या मोहिमेला अडता घातला होता. अखेर यावर तोडगा काढत शिक्षण मंडळाने केंद्रांवर कठोर देखरेखीसाठी पर्यायी उपाययोजना म्हणून कर्मचाऱ्यांची अदलाबदल करण्याचा निर्णय जाहीर केला. मात्र, तसे करणेही फायद्याचे ठरलेले नाही, कारण बहुतांश ठिकाणी शालेय कर्मचारीच कॉपी बहाद्दरांना कॉपी पुरवत असल्याचे दुर्दैवाने आढळून आले आहे. कन्नडच्या जैतापूरमधील राष्ट्रीय माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विद्यालयात विद्यार्थी एकाच बाकड्यावर बसून कुठलीही भीती न बाळगता बिनधास्तपणे कॉपी करत होते. पुस्तकांमधून उतारेच्या उतारे उत्तरपत्रिकेवर उतरवत होते. एवढेच नाही, तर शिक्षक, पर्यवेक्षक विद्यार्थ्यांना कॉपी करण्यास मदत करत होते. हा सर्व प्रकार सीसीटीव्ही कॅमेऱ्यात टिपला गेल्याने राज्यभर खळबळ उडालेली आहे. या फुटेजमध्ये विद्यार्थी परीक्षा केंद्रांवर पेपर देताना एकमेकांशी बोलताना, पेपरची अदलाबदली करताना, पर्यवेक्षकांच्या उपस्थितीत कॉपी करताना स्पष्टपणे दिसून येत आहेत. या प्रकारावरून मोठा वादंग झाल्यानंतर अखेर सामूहिक कॉपी केल्याप्रकरणी शिक्षण विभागाने १९ जणांना निलंबित केले आहे. त्यात झेडपीचे ३ शिक्षक, २ केंद्रसंचालकांसह १७ पर्यवेक्षकांसह बैठ्या पथकाचाही समावेश आहे. या प्रकरणात दोषी आढळणाऱ्यांवर केवळ विभागीय चौकशीच नाही, तर फौजदारी कारवाई करण्याच्याही हालचाली सुरू आहेत. राज्यातील कॉपी बहाद्दरांची आकडेवारी पाहता ग्रामीण भागात कॉपी पुरवणाऱ्या टोळ्या सक्रिय असल्याचे स्पष्ट होते. या कारवाईला शिक्षण विभागाने उपरवाला सब देख रहा है, अशी उपमा दिली. परंतु, परीक्षा केंद्रावर सीसीटीव्ही असूनही पर्यवेक्षक बिनदिक्कतपणे कॉपी बहाद्दरांना साथ देत असतील, तर हे अभियान केवळ कागदावरच आहे का? असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होतो. अनेकदा असे गैरप्रकार, आर्थिक आमिषांतून कमी आणि शाळांची, विभागाची टक्केवारी वाढवण्याच्या हेतूने जास्त प्रमाणात होताना दिसतात. त्यामुळे फक्त नजर ठेवून उपयोगाचे नाही तर इथे शालेय कर्मचारी, संस्थाचालकांच्या मानसिकतेतच मोठे परिवर्तन घडवून आणण्याची गरज निर्माण होते. एकीकडे विद्यार्थी प्रामाणिकपणे अभ्यास करून सुंदर भविष्याची स्वप्ने रंगवत असताना, दुसरीकडे जैतापूरसारख्या ठिकाणी होणाऱ्या सामूहिक कॉपीमुळे त्यांच्या गुणवत्तेवर अन्याय होत असेल तर ते शिक्षण विभागाचे अपयशच म्हणावे लागेल.

# राजकारण पुरे झाले, अर्थकारणावर बोल!

राज्यातल्या १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांचा निवडणूक कार्यक्रम संपल्यानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा एक मोठा टप्पा संपलेला आहे. उर्वरित २० जिल्हा परिषदा आणि त्या अतंर्गत पंचायत समित्यांचा निवडणूक कार्यक्रम जेव्हा यायचा तेव्हा येईल पण आता राज्याने अर्थकारणाला प्राधान्य देण्याची गरज आहे.



**राज्याने गेल्या चारेक वर्षात खूप राजकारण पाहिले. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका झाल्या असून नगरपालिका, नगर पंचायती, महापालिका, जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांमधील लोकनियुक्त व्यवस्था राज्याकडे निधीच्या आशेने पाहू लागेल.**

राज्य सरकार २०२५-२६ या आर्थिक वर्षात किती कर्जाऊ रक्कम उभारू शकेल याची मयार्दा १.३० लाख कोटींहून अधिकची ठरली होती. ती जवळपास पूर्ण होत आल्याने राज्यावरील कजार्चा बोजा साडेनऊ लाख कोटींच्या आसपास गेला आहे. नगरपालिका, नगर पंचायती, महानगरपालिका, जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या येथील लोकनियुक्त व्यवस्था आता राज्याकडे निधीच्या आशेने पाहू लागेल. नव्याने निवडून आलेल्या पदाधिकाऱ्यांना विकास कामांची घाई होणार हे ओघानेच आले.

राज्याचा २०२६-२७ चा अर्थसंकल्प मार्चच्या पहिल्या आठवड्यात येत आहे. हा अर्थसंकल्प एरवीच्या अर्थसंकल्पापेक्षा वेगळा असेल अशी शक्यता आहे. याचे प्रमुख कारण आता राज्यात लगेचच निवडणुकांचा कार्यक्रम नाही. लोकानुनयी आणि मतदारांना आकर्षित करू शकतील अशा घोषणा करण्याचे बंधन सरकारवर नाही. उलट ज्या लोकानुनयी योजना सुरू आहेत त्याचा आढावा घेतला जाण्याची शक्यता वाढत चालली आहे.

जुलै २०२४ मध्ये लाडकी बहीण योजना सुरू झाली तेव्हा २.४३ कोटी लाभार्थी महिलांना महिना १५०० रुपये देणे सुरू झाले. ती संख्या सध्या १.८८ कोटींच्या आसपास आली आहे. त्यात आणखी कपात होण्याची शक्यता अधिक आहे. एवढेच नव्हे तर महिला बचत गटांना अधिक प्राधान्य देण्याचे केंद्राचे धोरण असल्याने लखपती दिदी हा कार्यक्रम राज्यस्तरावर अधिक जोरकसपणे राबविला जाण्याची शक्यता आहे. तसे ठरले तर लाडकी बहिणचा फोकस तिकडे अधिक वळविला जाईल.

चालू आर्थिक वर्षात एकूण अर्थसंकल्पीत निधीच्या ६० टक्केच्या आसपासच निधी वितरीत झाला आणि त्यातही १०-१५ टक्के कमी खर्च झाला असे म्हटले जात आहे. म्हणजेच राज्य सरकारने खर्चात मोठी बचत केली आहे. सरत्या आर्थिक वर्षात जिल्हा नियोजन व विकास समित्यांना (डीपीडीसी) व आमदारांच्या स्थानिक विकास निधीला प्रत्यक्षात किती रक्कम वितरीत झाली याची राजकारणातल्या सर्व मंडळींना माहिती आहे पण त्यावर उघड चर्चा करण्याची तयारी आजवर कोणीही दाखविलेली नाही. याला सत्ताधारी पक्षाचा धाक म्हणावे की राज्याच्या आर्थिक स्थितीबाबत असलेली कणव म्हणावी हा प्रश्नच आहे.

सरकारला सुदैवाने फारच 'समंजस' विरोधी पक्ष लाभला आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. विरोधक डीपीडीसी, आमदार निधी, रिझर्व्ह बँकेने अलीकडेच प्रकाशित केलेल्या राज्यांच्या आर्थिक अहवालाबाबत, हिवाळी अधिवेशनात 'कॅग'च्या अहवालात आर्थिक स्थितीबाबत काय म्हटले आहे याबाबत चर्चा करण्यास फारसे उत्सुक दिसत नाहीत. बोलून काय उपयोग, त्यापेक्षा सरकारला आर्थिक स्थिती सुधारण्याबाबत काम करू द्यावे अशी 'सहिष्णू' भूमिका दिसते आहे. हे आत्यंतिक 'रचनात्मक' सहकार्याचे चिन्ह म्हणावे लागेल अशी स्थिती आहे.

१९९९ साली काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसचे सरकार आले. तेव्हा राज्यावरील कजार्ज बोजा ४० हजार कोटींपेक्षा कमीच होता. तरीही राज्याची अर्थव्यवस्था फार गंभीर आहे असे चित्र निर्माण झाले होते. राज्याच्या आर्थिक स्थितीबाबत तेव्हा श्वेतपत्रिका काढली गेली. शिवसेना-भाजपा युतीच्या सरकारने राज्य आर्थिक गाळात घातले असे सांगत सत्ताधारी आघाडीने युतीची कोंडी करण्याचा प्रयत्न केला. पण विरोधी पक्ष बधला नाही. उलट सरकारवरचे हल्ले वाढले आणि तत्कालीन विरोधी पक्षनेते नारायण राणे व अर्थमंत्री जयंत पाटील यांची चकमक राज्याला पहायला मिळाली.

२०१४ पर्यंत आघाडीचे सरकार होते व युती विरोधी बाकावर होती. पण सरकारला आर्थिक स्थितीहून वारंवार कोंडीत पकडले गेले. सभागृहात चर्चा होऊ शकली नाही तेव्हा विरोधी पक्षाच्या नेत्यांनी प्रमुख वृत्तपत्रात लेख लिहिले. त्याला अर्थमंत्र्यांनी उत्तर देणारे लेख लिहिले. आज अशी स्थिती निर्माण होण्याची शक्यताही कोणाला वाटणार नाही इतके वातावरण बदलले आहे. असो. राजकीय आघाडीवर कसेही वातावरण असले तर त्याला मुलामा देता येतो. पण आर्थिक बाबतीत सोंग करता येत नसते.

चालू आर्थिक वर्षात सरकारची महसुली तूट ४५ हजार कोटींच्या घरात राहील असा अंदाज होता. निवडणूक वर्षात ती वाढली की कमी झाली यासाठी अर्थसंकल्प सादर होईपर्यंत वाट पहावी लागणार आहे. सरकारची राजकोषीय तूट राज्याच्या एकूण सकल उत्पादनाच्या (जीडीपी) ३.३ टक्के झाली असल्याचे रिझर्व्ह बँकेचा अलीकडचा अहवाल सांगतो. अलीकडेच राज्य सरकारने दावोस येथील वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या बैठकीत मोठे करार केले. त्यातील काही करार प्रत्यक्षात येण्यास सुरुवात झाली आहे. ही गुंतवणूक लवकर झाली तर राज्याच्या उत्पन्नात मोठी भर पडेलच शिवाय बेरोजगारी कमी झाली तर राज्य वाढत्या कर्जाच्या ओज्याने अथवा तुटीच्या अर्थसंकल्पाने वाकून जाणार नाही.

देशातील बेरोजगारीचा दर दोन वर्षांपूर्वी ३.२ टक्के होता. तो राज्याच्या बाबतीत ३.१ टक्के होता. वाढत्या गुंतवणुकीमुळे बेरोजगारी कमी झाली तर राज्याच्या क्रयशक्तीला आणखी चालना मिळेल. याचा लाभ राज्याच्या अर्थव्यवस्थेला होईल. अर्थव्यवस्थेत सुधारणा करून काही धाडसी निर्णय घेण्याची संधी राज्य सरकारकडे चालून आली आहे. निवडणुकांचा काळ जवळपास संपुष्टात आला असल्याने त्याकडे अधिक लक्ष दिले जाईल अशी अपेक्षा करायला हरकत नाही.

मागे सरकारने एक निर्णय जाणीवपूर्वक घेतला होता. कोणताही सरकारी उपक्रम कर्ज काढो त्याला सरसकट सरकारी हमी दिली जात नव्हती. कारण तो उपक्रम कर्जाची परतफेड करू शकला नाही तर सरकारने त्याची परतफेड करायचे ठरवले तर अर्थव्यवस्था कोलमडून पडण्याची भीती असते. आता विकास कामांसाठी कर्ज काढताना सरकारला हमी द्यावी लागते. राज्य रस्ते विकास महामंडळ, राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आदींच्या विकास कामांना सरकारची हमी आहे. या विकास कामांतून आर्थिक परतावा ठरल्याप्रमाणे मिळण्यास विलंब झाला तर सरकारची हमी उपयोगात आणली जाण्याची शक्यता आहे. तेव्हा सरकार काय करेल, हा विषय पुढे येईल.

समृद्धी महामार्ग, अटल सेतू, मुंबई मेट्रो, इतर मेट्रो प्रकल्प यातून किती उत्पन्न सुरू होईल याचे जे अंदाज होते त्याप्रमाणे ते मिळाले तर कजार्ची परतफेड व्यवस्थित होईल. अन्यथा सरकारला त्याची काळजी करावी लागेल. नजिकच्या भविष्यात वांद्रे-वसोर्वा सी लिंक, शक्तीपीठ महामार्ग, जनकल्याण मार्ग याची कामे सुरू होणार आहेत. त्यासाठी लागणाऱ्या कर्जाची हमी सरकारला स्वीकारावी लागेल. शिवाय महामार्गांच्या भूसंपादनाची रक्कम सरकार उपलब्ध करून देणार आहे. तो आकडाही मोठा असेल असा अंदाज आहे. सरकारने मोठी जोखीम पत्करली आहे, असे म्हटले तर चूक नाही.

राज्याने गेल्या चारेक वर्षात खूप राजकारण पाहिले. जून २०२२ साली सत्तेवर आलेल्या भाजपा-शिवसेना-राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीला पहिल्या टर्ममध्ये पुन्हा सत्तेवर येण्यासाठी काही धाडसी निर्णय घ्यावे लागले. त्यानंतर स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांचा कार्यक्रम आला. राजकीय गोष्टी महायुतीने जशा ठरविल्या तशा घडत गेल्या आहेत. राजकारणात सोंगे घेता येतात. मात्र पैशाचे सोंग आणता येत नाही. आता राज्याच्या अर्थव्यवस्थेला आकार देण्याची आवश्यकता आहे.

# प्रशासकांना जे जमले नाही ते नेते करणार का?

आधी कोरोना, मग प्रभाग रचना, ओबीसी आरक्षण या कारणांमुळे गेल्या काही वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडल्या होत्या. निवडणुका न झाल्याने अनेक महापालिकांसह जिल्हा परिषदा, नगरपंचायती तसेच पंचायत समित्यांमध्ये गेल्या काही वर्षांपासून प्रशासकीय राजवट सुरू असल्याचे अनुभवायला मिळाले. गेल्या अनेक वर्षांच्या इतिहासात राजकीय नेत्यांऐवजी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये प्रशासकीय राज सुरू होते. उच्चशिक्षित प्रशासकीय अधिकार्यांच्या हाती कारभाराची सूत्रे आल्यानंतर विकासकामे ही जलदगतीने, कोणत्याही अडथळ्याविना पार पडतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात होती. कारण, यावेळी राजकीय नेत्यांचा कोणताही अडसर त्यात नव्हता. कमी शिक्षित राजकीय नेत्यांच्या तुलनेत उच्चशिक्षित प्रशासकीय अधिकारी हे उत्तमरित्या कार्य करून दाखवू शकतात, ही संधी त्यांच्याकडे होती. राजकीय नेत्यांपेक्षा काहीतरी वेगळेपणाने, असाधारणपणे कामे करत शहरांच्या विकासकामांमध्ये आमूलाग्र बदल घडवून आणता आले असते. इतरवेळी असणारी राजकीय लुडबूडदेखील यावेळी नसायची. एखाद्या कामाबाबत माजी नगरसेवकाकडे गेल्यास आम्हाला आता याबाबतचे काही अधिकार नसल्याचे उत्तर त्यांच्याकडून दिले जात असे. प्रशासकीय राजवट असल्याने अधिकारी आणि कर्मचारीच तक्रारींचा निपटारा करतील, अशी उत्तरे त्यांच्याकडून दिली जात होती.





**गेल्या काही वर्षांपासून विविध स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये पूर्णपणे प्रशासकीय राजवटच कार्यरत होती. मात्र, कमी शिक्षित नेत्यांऐवजी उच्चशिक्षित अधिकारी कारभारी असले तरी विकासकामांसह अनेक बाबींमध्ये फार काही अपेक्षित बदल दिसून आलेले नाहीत. निवडणुकांनंतर आता प्रशासकीय राजवट संपुष्टात येऊन पुन्हा राजकीय नेत्यांच्या हाती सत्ता आली आहे. त्यामुळे जी कामे प्रशासकीय राजवटीत झाली नाही ती आता राजकीय नेते वेगाने करून दाखवणार का? की पुन्हा आरोप-प्रत्यारोपांचेच सत्र लोकांना पहायला मिळणार आहे?**

प्रशासकीय राजवटीत राजकीय नेते सहजासहजी थेट हस्तक्षेप करत नसल्याने अधिकारी आणि कर्मर्चायांना स्वांतत्र्य होते. त्यामुळे या सुवर्णसंधीचे सोने करून दाखविण्याची अपेक्षा त्यांच्याकडून व्यक्त करण्यात येत होती. शहरांबाबत एखादा मोठा निर्णय घेणे शक्य नसले तरी शहराची स्वच्छता योग्य पद्धतीने राखणे, त्याचे सौंदर्य जपणे, नव्या रस्त्यांच्या उभारणीचा निर्णय घेणे शक्य नसले तरी यापूर्वी ठरलेल्या रस्त्यांची कामे वेळेत पूर्ण करणे, त्याची देखभाल दुरुस्ती योग्य प्रकारे करणे, स्वच्छ पाणीपुरवठा दैनंदिनरित्या योग्यप्रमाणे करणे आदी प्रकारची कामे ही प्रशासकीय राजवटीत विनाअडथळा होणे अपेक्षित होती. परंतु, तशी काही होताना ती जाणवली नाही. राजकीय नेत्यांच्या हाती सत्ता असताना जशी कार्यपद्धती होती तशाच पद्धतीचे काम प्रशासकीय राजवटीतही होताना दिसले. त्यात काही वेगळेपणा जाणवला नाही. प्रशासकीय राजवट संपून आता पुन्हा एकदा सत्तेच्या चाव्या जनतेने निवडणुकांनंतर राजकीय नेत्यांच्या हाती सोपविल्या आहेत. राजकीय नेते गेल्या काही वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांमधील सत्तेपासून वंचित होते. त्यांच्याकडे कामे करण्याची संधी नव्हती. आता ती त्यांना प्राप्त झाली असून गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेली कामे वेळेत पूर्ण करून दाखवण्याची सुवर्णसंधी मिळाली आहे. त्यामुळे सर्व कामे तातडीने पूर्ण करून दाखवून या संधीचे सोने करून दाखवावे, हीच अपेक्षा.

राजकीय नेते आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांनी गाडीच्या दोन्ही बाजूंच्या चाकांप्रमाणे काम करणे अपेक्षित असते. एखाद्या गाडीची दोन्ही चाके व्यवस्थितपणे सुरू असतात तेव्हाच गाडी यशस्वीपणे पुढे जाते. परंतु, दोन्हींपैकी एका बाजूच्या चाकात जरी बिघाड झाला तर गाडीला पुढे जाणे अशक्यच होऊन बसते. असेच काहीसे आपल्याकडील विकासकामांबाबत तसेच सार्वजनिक सोयी, सुविधांबाबत होताना दिसते. रस्ते, उड्डाणपूल, सार्वजनिक स्वच्छता, पाणीपुरवठा, शिक्षण, आरोग्य सुविधा, पर्यावरण, परिवहन सेवा आदी सर्व गोष्टींची व्यवस्थितपणे कधीच पूर्तता होताना दिसत नाही. रस्ते, उड्डाणपूल वर्षानुवर्षे रखडणे, सार्वजनिक ठिकाणी सर्वत्र अस्वच्छतेचा उडालेला बोजवारा, विविध विकासकामांचा काही दर्जा नसणे आदी प्रकारची अवस्था पाहिल्यानंतर खरेच आपण प्रगतीच्या दिशेने वाटचाल करत आहोत की अधोगतीच्या दिशेने, असा प्रश्न पडल्याशिवाय राहत नाही. ब्रिटिशांच्या गुलामगिरीतून देशाला स्वातंत्र्य मिळून ७८ वर्षे झाली तरी आपण आजही अनेक विकासकामांसाठी संघर्ष करताना दिसतो. भारत आजच्या घडीला जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था असणारा देश आहे. लवकरच आपली अर्थव्यवस्था ही जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनण्याकडे वाटचाल करत आहे. परंतु, आपल्याकडील अगदी राजधानीच्या शहरांतील विकासकामांची अवस्था ही काही म्हणावी तशी चांगली नाही. आपल्याकडील नेते आणि प्रशासक अन्य विकसित देशांचे दौरे करून तिथल्या विकास प्रकल्पांची पाहणी करून येतात, पण तसे काही इकडे करण्याचा त्यांचा फारसा कल दिसत नाही. कारण त्यासाठी इथल्या नेत्यांना आणि प्रशासकांना भरपूर मेहनत घ्यावी लागेल. विदेशात जे गांभीर्य असते ते आपल्याकडे दिसत नाही. त्याचीच परिणती अस्वच्छ शहरे आणि बजबजपुरीमध्ये होत असते.

कितीही पाऊस पडला तरी आठवड्यातून काही दिवस पाणी नसणे, दूषित पाणीपुरवठा होणे, सरकारी रुग्णालयांमध्ये औषधांचा कायमचा तुटवडा, परिवहन सेवा तोट्यात आदी समस्या या कायम असतात. या समस्या मिटविण्याची ज्यांच्यावर जबाबदारी आहे ते नेहमी याबाबत चालढकल करत आल्यानेच आज अनेक वर्षांनंतरही त्या मार्गी लागण्याऐवजी आहे त्या स्थितीत किंवा त्याहून अधिक बिघडलेल्या स्थितीत गेल्याचे पाहायला मिळते. राजकीय नेत्यांना याबाबत विचारले तर आम्ही याबाबत ठोस निर्णय घेतले. परंतु, प्रशासकीय अधिकारी, कर्मचाऱ्यांनी कामात हलगर्जीपणा केल्याचा आरोप करत त्यांच्यावर खापर फोडण्याचा प्रयत्न केला जातो. प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी राजकीय नेत्यांचे आर्थिक गैरव्यवहार, भ्रष्टाचार तसेच कंत्राटदारासोबत असणारे साटेलोटे आदी बाबींकडे बोट दाखवून चालढकलपणा करतात. वर्षानुवर्षे हेच होत आले आहे. प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी आणि राजकीय नेत्यांची एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करण्याची स्पर्धाच इतकी तीव्र होऊन बसते की, मूळ समस्या राहिल्या बाजूला आणि एकमेकांविरोधातील संघर्ष हा थेट हाणामारीपर्यंत जाऊन पोहोचल्याच्याही घटना आपल्याकडे घडल्या आहेत. जेथे एकमेकांसोबत परस्पर सहकार्याने काम करणे अपेक्षित होते, तेथे असे हाणामारीचे प्रकार घडल्यानंतर विकासकामांची गाडी तरी व्यवस्थित कशी चालणार? काही प्रकरणांत तर अगदी उलट म्हणजे राजकीय नेते आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांचे असे काही साटेलोटे असते ते पाहिले तर हे एकाच नाण्याच्या दोन बाजू असल्याचे जाणवते.

कामे होत नसल्याबाबत विचारल्यास ते काही आमच्या अखत्यारित येत नसून त्रयस्थ दूरवरचे खाते त्यासाठी जबाबदार असल्याचे सांगून याबाबत तेरी भी चूप आणि मेरी भी चूप असेच धोरण राजकीय नेत्यांसह प्रशासकीय अधिकाऱ्यांकडून अंगी बाळगले जाते. अशी अवस्था राहिल्यानंतर राजकीय नेत्यांच्या भ्रष्टाचारासोबत प्रशासकीय अधिकारी आणि कर्मर्चायांची खाबुगिरी तसेच कंत्राटदारांचा खिसेभरूपणा सुरू होतो आणि मग कामे ही वर्षानुवर्षे रखडली जातात. राजकीय नेत्यांकडे निर्णय घेण्याचे अधिकार असतात. एखाद्या विकासकामांबाबत सरकार दरबारी निर्णय झाल्यानंतर प्रशासकीय अधिकाऱ्यांनी कर्मचाऱ्यांनी ते काम नीट, व्यवस्थितपणे वेळेवर पार पाडणे अपेक्षित असते. कामांबाबत निर्णय घेण्याचा अधिकार त्यांना नसतो. परंतु, उपलब्ध असणाऱ्या सामुग्रीत नेमून देण्यात आलेली कामे ही नीट, व्यवस्थितरित्या पूर्ण करण्याचे कौशल्य त्यांच्याकडे नक्कीच असते. याबाबतची योग्यताही पूर्ण केल्यानंतरच त्या पदावर त्यांची नेमणूक झालेली असते. त्यामुळे अशा जबाबदार व्यक्तींचीच प्रशासनातील महत्त्वाच्या पदांवर नियुक्ती केली जाते. यासाठी योग्य प्रमाणात मोबदलाही दिला जातो. परंतु, सर्व काही असले तरी अनेकदा राजकीय दबावापोटी प्रशासकीय अधिकारी, कर्मचाऱ्यांना आपली कामे योग्यरित्या करता येत नाहीत, अशी परिस्थिती असते.

कधीकधी तर सरकार दरबारी निर्णय होईपर्यंत वाट पाहत राहणे त्यांना भाग असते. जोपर्यंत अशा गोष्टींसाठी निर्णयच होत नाही तोपर्यंत कामे सुरू तरी कशी करायची, असा प्रश्न असतो. त्यामुळे प्रशासकीय अधिकारी, कर्मचाऱ्यांना निर्णयासाठी राजकीय नेत्यांवर अवलंबून राहावे लागते. तर, याउलट राजकीय नेत्यांना कामे पूर्ण करून घेण्यासाठी प्रशासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची गरज असते. त्यामुळे या दोघांनाही एकमेकांच्या सहकार्याची गरज असते. दोघांच्याही परस्पर सहकार्यानेच कामे पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. नुसत्या आरोप-प्रत्यारोपांच्या स्पर्धेतून कुणीही वरचढ किंवा श्रेष्ठ ठरणार नाही. उलट कामे अपूर्ण राहिल्याचा ठपकाच बसणार. हे त्यांनी लक्षात घ्यायला हवे.

# 'कागदावरील' निधी



आज खेड्यापाड्यातील, डोंगरदऱ्यांतील जनतेचे एसटी बस हेच प्रवासाचे मुख्य साधन आहे. राज्यात सर्वदूर पसरलेला व दळणवळणाचे मुख्य साधन म्हणून कार्यरत असलेला एसटी हा सेवाभावी राज्य सरकारचा अंगीकृत सार्वजनिक उपक्रम असल्याने तो नफातोट्याच्या गणितावर चालत नाही. सरकारच्या धोरणामुळे व खासगी अवैध वाहतूक बेसुमार वाढल्याने त्याचा फटका या व्यवसायाला बसून तो कायमस्वरूपी घाट्यात जात आहे. आज एसटीचा संचित तोटा १२ हजार कोटी रुपये झाला असून स्वतःच्या आर्थिक स्रोतातून विकास होत नसल्याने राज्य सरकार दरवर्षी नवीन गाड्या घेण्यासाठी, प्रवाशांना नवनवीन योजना तसेच सुविधा उपलब्ध देण्याच्या हेतूने अद्ययावत नवीन स्थानके बांधण्यासाठी, स्थानक नूतनीकरणासाठी अर्थपुरवठा करीत आहे. पण काही वेळा सरकारच्या जाचक धोरणामुळे, तर कधी व्यवस्थापनाची दिरंगाई व उदासीनतेमुळे हा निधी एसटीच्या तिजोरीत न येता फक्त घोषणेपुरता वा कागदावरच राहिल्याचे वास्तव समोर आले आहे. राज्याच्या अर्थसंकल्पात सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी परिवहन महामंडळाला बसखरेदी, स्थानक नूतनीकरण तसेच अन्य प्रवासी सुविधांसाठी सुमारे दोन हजार ४६० कोटी रुपये निधी मंजूर झाला होता, पण अर्थसंकल्पीय वर्ष संपायला दोन महिने बाकी असताना तब्बल १६०० ते १७०० कोटी रुपये खर्च न होता परत जात आहेत. त्याची दखल घेऊन यासंदर्भात आढावा बैठक घेऊन परिवहन मंत्री व एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी एसटी महामंडळाच्या संबंधित अधिकाऱ्यांना धारेवर धरल्याचे वृत्त प्रसार माध्यमातून पाहायला मिळाले. निविदा प्रक्रिया वेळेत पूर्ण न केल्यामुळे अपेक्षित रक्कम खर्च करण्यात अपयश आल्याचे सकृतदर्शनी दिसत असले तरी याला व्यवस्थापनाबरोबर सरकार देखील जबाबदार आहे. 'सरकारी काम आणि सहा महिने थांब,' या म्हणीची प्रचीती येथे येते. त्याला एसटी महामंडळातील अधिकाऱ्यांनीही काही अंशी हातभार लावला आहे. राज्य सरकार व महामंडळाचे व्यवस्थापन या दोघांच्याही बेजबाबदारपणामुळे ही वेळ आली आहे. महामंडळ स्थापनेपासूनचा इतिहास पाहिला तर राज्यातील विविध बसस्थानकांचे नूतनीकरण व आधुनिकीकरणासाठी आलेला कोट्यवधींचा निधी खर्च न होता परत गेल्याचेही बऱ्याचदा घडले आहे. यावर्षी बस खरेदीबाबत मात्र वेगळी परिस्थिती आहे. हा निधी महामंडळाला मिळालाच नसून सरकारच्या वेळोवेळी बदललेल्या धोरणामुळे तो एसटीच्या तिजोरीत न येता फक्त घोषणेपुरता राहिला. मुळात तीन हजार नवीन गाड्या खरेदीसाठी जी निविदा प्रक्रिया राबविण्यात आली, तिच्यात राज्य सरकारने वारंवार हस्तक्षेप केला. शासनाकडून आलेल्या सूचनांमुळे तब्बल १४ वेळा या प्रक्रियेत बदल करण्यात आला. यात शासनाचा हेतू कदाचित चांगला असेलही; पण कुठलीही सूचना एकदाच केली जात असेल तर हरकत नाही, पण वारंवार हस्तक्षेप केला गेल्याने या प्रक्रियेला वेळ लागला. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांना स्मार्ट बस आणायच्या होत्या, त्यात महिलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने बसमध्ये सीसीटीव्ही, चालकाच्या केबिनमध्ये अत्याधुनिक अल्कोहोल प्रतिबंधक उपाययोजना (चालक मद्यप्राशन करून सीटवर बसल्यास गाडी सुरूच होणार नाही, अशा प्रकारची यंत्रणा) या शिवाय एलईडी स्क्रीन अशी आधुनिक पद्धतीची साधने मंत्रीमहोदयांना अपेक्षित होती. बदलत्या काळात या सगळ्या गोष्टींचा समावेश असण्यास हरकत नाही, पण हे सर्व निविदा प्रक्रिया राबविण्याच्या अगोदर सांगणे अपेक्षित होते, पण पुनःपुन्हा या प्रक्रियेत बदल सुचविण्यात आल्याने खूप वेळ गेला व प्रक्रियेला अंतिम स्वरूप मिळाले नाही. मुळात बसखरेदीबाबत शासन व एसटीची स्वतःची काही मार्गदर्शक तत्त्वे आहेत, परिपत्रकेही आहेत. त्याचा अवलंब करूनच निविदा प्रक्रिया राबविण्यात येते. त्यामुळे प्रक्रिया राबविताना अडचणी निर्माण होतात.

# नावडते असले तरी आठवड्यातून एकदा कारले खावेच!

'कडू कडू कारले, बाजारात फिरले त्याला पाहून नाक भेंडीने मुरडले'. लहानपणी भाज्यांवर आधारित एका 'बडबड गीता'मध्ये कारल्याचे वर्णन अशाप्रकारे केले होते. कारले किंवा कारल्याची भाजी म्हटली की सगळेच नाक मुरडतात, पण ही कारली कितीही कडू असली तरी आरोग्य मात्र उत्तम ठेवतात. कारल्यामध्ये कॅल्शिअम, लोह, फॉस्फरस 'अ', 'क' जीवनसत्त्व भरपूर प्रमाणात असते. आपल्याकडे कारल्याची भाजी सहसा कोणी करत नाही, केलीच तर मीठ टाकून तिच्यामध्ये असलेले सारे पौष्टिक घटक काढून टाकतात. कारल्यातलं पाणी काढून टाकलं की ती कमी कडू लागते, असा अनेक गृहिणींचा समज आहे. पण, यामुळे भाजीतील जीवनसत्त्व पूर्णपणे वाया जाते याची कल्पना त्यांना नसते. कारल्याला आयुर्वेदात खूप महत्त्व आहे. फक्त भाजीसाठीच नाही तर औषधांमध्येही कारल्याचा वापर केला जातो. कारले कितीही नावडते असले तरी आहारात आठवड्यातून किमान एकदा तरी या फळभाजीचा समावेश असलाच पाहिजे.

**कारल्याचे फायदे**

■ कारल्याच्या रसामुळे रक्त शुद्ध होते, त्यामुळे त्वचाविकार होण्याचा धोका कमी होतो.

■ कावीळ झाल्यास ताज्या कारल्यांचा रस सकाळ-संध्याकाळ घेतल्यास यामुळे कावीळ दूर होते.

■ यकृताच्या सर्व विकारांमध्ये कारल्याचा रस फायदेशीर असतो.

■ जंत किंवा कृमींचा त्रास असल्यास कारल्याची भाजी किंवा रस घेतल्यानं कृमींचा त्रास कमी होतो.

■ दमा, सर्दी, खोकल्याचा त्रास असेल तर कारल्याचा रस व तुळशीच्या पानांचा रस एकत्र करून त्यात मध मिसळून महिनाभर घेतल्यास रोगप्रतिकार शक्ती वाढून हे त्रास दूर होतात.

■ कारले हे शक्तिवर्धक आहे, म्हणून लहान मुलांच्या आहारातही कारल्याचा समावेश आवर्जून करावा.

# जपा संत्र सेवनाचा मंत्र!

संत्री खाताना काळजी घ्यावी. सर्दी, खोकला झाला असेल तर अति आंबट चवीचे व कच्चे संत्रे खाऊ नये, त्यामुळे खोकला अधिकच वाढू शकतो. आंबट गोड चवीची, पिवळ्या केशरी रंगाची संत्री सगळ्यांच्या आवडीची असतात. संत्र्यात भरपूर प्रमाणत 'अ', 'ब' आणि 'क' जीवनसत्त्व असतं. साधारण थंडीत संत्र्यांचा हंगाम सुरू होतो. महाराष्ट्रात नागपूरमध्ये संत्र्याचं पीक मोठ्या प्रमाणात घेतलं जातं. संत्र्यापासून ज्यूस, जॅम, जेली, अत्तर , सुगंधी तेल, चूर्ण असे अनेक पदार्थ तयार केले जातात. पण फक्त खाद्यपदार्थ किंवा सौंदर्य पदार्थच नाही, तर आरोग्याच्या अनेक समस्यांवर संत्रे फायदेशीर आहे. चला तर या संत्र्याचे फायदे जाणून घेऊयात.

■ भूक मंदावणे, पोटात गॅस होणे अशा समस्यांवर संत्र्याचा रस प्यायल्यास खूप आराम पडतो.

■ मळमळल्यासारखं होत असल्यास संत्र्याची साल हुंगल्यास लगेच आराम पडतो.

■ पचनशक्ती वाढवण्यासाठी संत्र खावे.

■ मलावरोधाचा त्रास होत असल्यास रात्री झोपण्यापूर्वी संत्र्याच्या फोडी पांढऱ्या सालीसकट खाव्यात, सालीतील तंतुमय पदार्थामुळे शौचास साफ होते.

■ संत्र्यामध्ये असणाऱ्या 'क' जीवनसत्त्वामुळे दातांच्या अनेक समस्या दूर होतात.

■ थकवा, अशक्तपणा जाणवत असल्यास संत्रे खावे.

■ हंगाम संत्री आवर्जून खावी, कारण त्वचेचे सौंदर्य सुधारण्यासाठी संत्रे मदत करते.

■ संत्रे ही थंड असतात. अति उष्णतेचा त्रास झाल्यास संत्र्याचा रस प्यावा.

■ संत्र्याची साल वाळवून त्यापासून चूर्ण तयार करावे. हे सूक्ष्म चूर्ण चेहऱ्यावर लावल्यास मुरुमे व पुटकुळ्या दूर होऊन त्वचा कांतियुक्त होते.



■ संत्र्याच्या नियमित सेवनामुळे रोगप्रतिकारक शक्ती वाढते.

पण संत्री खाताना काळजी घ्यावी, सर्दी, खोकला झाला असेल तर अति आंबट चवीचे व कच्चे संत्रे खाऊ नये, त्यामुळे खोकला अधिकच वाढू शकतो.

# व्यायामापूर्वी अशी घ्या त्वचेची काळजी

**आपण आपल्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी व्यायाम करतो. पण त्यामध्ये आपल्या त्वचेची काळजी घेतली जात नाही. असे बरेच कमी लोक असतात, जे वर्क आऊट्सच्या पूर्वी आपल्या त्वचेची योग्यरीत्या काळजी घेतात. असं करणं फार महत्त्वाचं असत. कारण वर्क आऊट्सच्या दरम्यान भरपूर घाम येतो आणि जर आपली त्वचा स्वच्छ नसेल तर घाणेरड्या त्वचेवर घामामुळे बॅक्टेरिया अधिक वाढू शकतात. याशिवाय व्यायामाच्या दरम्यान आपल्या त्वचेचे निर्जलीकरण होते. चला तर मग आज आम्ही आपल्याला सांगत आहोत की, व्यायामापूर्वी त्वचेची काळजी कशी घ्यावी...**



**त्वचा** तज्ञ म्हणतात की, जेव्हा आपण वर्क आऊटसाठी जात असाल तेव्हा मेकअपपासून शक्य असेल तेवढे वाचावे. हे आपल्या छिýi आणि घामाच्या ग्रंथींना अवरोधित करतात, यामुळे आपल्या त्वचेला श्वास घ्यायला अडचण होते. म्हणून आपण वर्क आऊट करायला जाण्यापूर्वी आपल्या त्वचेला चांगल्या प्रकारे स्वच्छ करून घ्या. यासाठी आपण एखाद्या फेसवॉशने चेहरा स्वच्छ करणे अधिक चांगले राहील.

**मॉइश्चरायझिंग करणे आवश्यक**

त्वचेची काळजी घेणारे तज्ञ म्हणतात की, त्वचा स्वच्छ केल्यावर तिला मॉइश्चराइझ करणे देखील आवश्यक आहे. वास्तविक वर्क आऊट्स दरम्यान आपल्या त्वचेमधून भरपूर घाम येतो, जे आपल्या त्वचेचे निर्जलीकरण करतो. अशा परिस्थितीत त्वचेचा ओलावा टिकवून ठेवण्यासाठी मॉइश्चराइझ करणं आवश्यक असतं. म्हणून जेव्हा आपण आपला चेहरा स्वच्छ कराल तेव्हा आपल्या चेहऱ्यावर मॉइश्चरायझर आणि लिप बाम लावा, कारण वर्क आऊट केल्यावर आपले ओठ कोरडे होतात आणि फाटतात.

**एसपीएफ संरक्षणाला दुर्लक्षित करू नका :** त्वचा तज्ञ म्हणतात की, प्री-वर्क आऊट त्वचेची काळजी घेताना सूर्याच्या किरणांपासून संरक्षण करणे देखील महत्त्वाचे आहे. जर आपण वर्क आऊट दरम्यान मैदानी व्यायाम करण्याची योजना आखत असाल, तर जसे की बागेत जाऊन धावणे किंवा बाहेरच योगा करत असाल तर बाहेर जाण्यापूर्वी सनस्क्रीन लावणे विसरू नका.

**अँटिपर्सीपरंट लावा :** हे खरे आहे की आपल्याला व्यायामशाळेत किंवा वर्क आऊट्स करताना खूप घाम गाळावा लागतो. तर आपल्या बगलेला अँटिपर्सीपरंट रोलऑन करून बॅक्टेरिया आणि जंताचे घर होण्यापासून संरक्षण करा.



# काळे, दाट, सुंदर केसांसाठी ऑलिव्ह ऑइलचा वापर

**जास्त उन्हात केसांच्या अनेक समस्या निर्माण होतात. शरीराची विशेष काळजी घेणं या वेळी गरजेचं असतं. गर्मीमुळे घाम, ओलसरपणामुळे केस अधिकच खराब व्हायला लागतात. त्यात बदललेल्या जीवनशैलीचा आणि खाण्या-पिण्याचा परिणाम... अशात केसांची योग्य ती काळजी घेणं गरजेचं असतं... त्यासाठी ऑलिव्ह ऑईल उपयुक्त आहे.**

- ऑलिव्ह ऑइलनं केसांची मसाज करा, हे एक उत्तम कंडिशनर आहे.
- ऑलिव्ह ऑइल एक अँटी ऑक्सिडेंटचं काम करतं. त्यामुळं डँड्रफ आणि केस पांढरे होण्यापासून वाचतात.
- जर आपण केसांसाठी होममेड ट्रिटमेंट घेऊ इच्छिता तर ऑलिव्ह ऑइल बेस्ट आहे. ते आपले केस हेल्दी करतात.
- ऑलिव्ह ऑइलमध्ये मोनो सॅच्युरेटेड फॅटी ॲसिड असतं. जे केसांना नैसर्गिक ओलावा देतं.
- ऑलिव्ह ऑइल त्वचेसाठीही फायद्याचे आहे. यानं मालिश केल्यास त्वचेतील ओलावा टिकून राहतो.



# रात्री चुकूनही खाऊ नका 'हे' पदार्थ

**निरोगी आणि सुदृढ आरोग्य हवं असेल तर आहारात पौष्टिक पदार्थांचा समावेश करा, असा सल्ला कायमच डॉक्टरांकडून दिला जातो. त्यासोबत सकाळचा नाश्ता भरपेट करावा, दुपारचं जेवण थोडं कमी करावं आणि रात्रीचं जेवण अत्यंत हलकं घ्यावं, असंही म्हटलं जातं. मात्र, अनेकदा आपण याकडे दुर्लक्ष करतो. अनेकदा काही जण रात्रीच्या जेवणात मसालेदार पदार्थ, फास्टफूड यांचा समावेश करतात.मात्र, ते शरीरासाठी अत्यंत चुकीचं आहे. त्यामुळे रात्री झोपण्यापूर्वी कोणत्या पदार्थांचं सेवण करणं टाळलं पाहिजे, हे जाणून घेऊयात.**

**भात :** अनेकांना रात्री भात खाल्ल्याशिवाय झोप येत नाही. मात्र, रात्रीच्या वेळी भात खाल्ल्यामुळे शरीरात अतिरिक्त चरबी निर्माण होण्याची शक्यता असते. रात्री भात खाल्ल्याने पोटाकडील चरबी वाढते.

**फास्ट फूड/तेलकट पदार्थ :** पिझ्झा, बर्गर, फ्राईज यासारखे फास्ट फूड आणि तळलेले पदार्थ रात्रीच्या वेळी खाणे टाळा. अपचन किंवा ॲसिडिटीमुळे निद्रानाश होऊ शकतो.

**चॉकलेट :** काही जणांना रात्री जेवण झाल्यावर गोड खाण्याची सवय असते. त्यामुळे बऱ्याच वेळा चॉकलेट खाल्लं जातं. मात्र, चॉकलेट हे कितीही आवडीचे असले तरी झोपण्यापूर्वी ते खाऊ नका. कारण चॉकलेट्समध्येही काही प्रमाणात कॅफेन असते. तेव्हा रात्रीच्या वेळी चॉकलेटच्या अतिसेवनामुळे झोपेवर परिणाम होऊ शकतो.

**मांसाहारी पदार्थ :** रात्रीच्या वेळी मांसाहार पूर्णपणे वर्ज्य करावा. कारण, मांस पचायला २४ ते ७२ तासांचा कालावधी लागतो. यामुळे वजन तर वाढतेच, पण रात्री अपचनामुळे झोपमोडही होऊ शकते. तेव्हा मांसाहार करणे टाळा.

**चायनीज पदार्थ :** चायनीज पदार्थांमध्ये एमएसजी अर्थात मोनोसोडियम ग्लुटामेट असते. आरोग्याच्या दृष्टीने तो घातक असतोच पण त्यामुळे निद्रानाशही होऊ शकतो.

दरम्यान, रात्री जेवण केल्यानंतर एक-दोन तासांतच आपण झोपी जातो, त्यामुळे पचनक्रिया मंदावते. अशावेळी फारच कमी खाणे किंवा हलके-फुलके खाणे फायद्याचे ठरेल. अनेक पदार्थ हे पचायला जड असतात, त्यामुळे रात्री शक्यतो कमी खाण्याचा सल्ला दिला जातो. तेव्हा रात्री जेवताना काही पदार्थ खाणे हे आवर्जून टाळले पाहिजे.



# शेवयांचा उपमा

**सकाळचा नाश्ता म्हटले की, पोहे, उपमा, शिरा हे ठरावीक पदार्थ खायला मिळतात. एका सकाळी आपल्याला शेवयांचा उपमा करता येईल. खवय्यांना आवडेल अशी ही स्वादिष्ट डिश आहे.**

**साहित्य :** शेवया, नारळ, मटार, चणाडाळ, टोमॅटो, लाल मिरची, गोडेतेल, कढीपत्ता, कांदे, मोहरी, हिंग, मीठ, जिरे.

**कृती :** कढईत शेवयांचा चुरा तांबूस रंग येईपर्यंत भाजा. भाजताना तेल नको. पाणी गरम करून ठेवा. एका पातेल्यात तेल गरम करून त्यात हिंग, मोहरी, जिरे, मिरच्यांचे तुकडे, कढीपत्ता, भिजलेली डाळ, कांदा, हळद सर्व टाकून लालसर होईपर्यंत परतून घ्यावे. त्यात गरम केलेले पाणी टाकून मीठ टाकावे. चवीला साखर, कोथिंबीर, नारळाचा चव घालून उकळावे. उकळलेल्या पाण्यात भाजलेल्या शेवयांचा चुरा घालावा व त्या शिजवाव्यात.



# चेहऱ्यावर सुरकुत्या होण्या मागील मुख्य ७ कारणे

**आपणासदेखील असं वाटत की आपले वय कमी आहे, पण सुरकुत्यांमुळे चेहऱ्यावरील चार्म गमावत आहे, तर त्यामागे बरीच कारणे असू शकतात. चला तर मग चेहऱ्यावर सुरकुत्या होण्यामागील कारणे जाणून घेऊया. सुरकुत्या सरत्या वयाचा एक भाग आहे. कॉलेजनचे उत्पादन वेळेनुसार कमी होतं, ज्यामुळे आपली त्वचा लवचिकता गमावून बसते. सरत्या वयासह सुरकुत्या होणे स्वाभाविकच आहे, पण अशी अनेक कारणे आहेत ज्यामुळे अकालीच सुरकुत्या दिसू लागतात. यामधील काही तर आपल्या दररोजच्या सवयीमुळे देखील असू शकत. जसे की साखरेचे सेवन किंवा सूर्याच्या प्रकाशात जास्त काळ राहिल्यामुळे आपल्या त्वचेवर फाईन लाइन्स दिसू लागतात. तथापि अद्याप उशीर झालेला नाही. आपण इच्छित असल्यास आपल्या दिनचर्येत आवश्यक बदल करून या सुरकुत्यांना चेहऱ्यावर येण्यापासून रोखू शकता.**



**आपल्या त्वचेला घासणे :** जर आपण जोराने आपल्या चेहऱ्याला मेकअप वाईप किंवा टॉवेलने चोळत असाल किंवा आयलायनर लावण्यासाठी आपल्या डोळ्याच्या भोवतीच्या त्वचेला ताणत असाल, तर यामुळे देखील सुरकुत्या येऊ शकतात. वारंवार असे करण्याची सवय आपल्या त्वचेसाठी नुकसानदायी होऊ शकते.

**पुरेशी झोप न घेणं :** आपण झोप घेता त्यावेळी कॉर्टिसॉल( तणावाचे हार्मोन)ची पातळी स्वाभाविकरीत्या कमी होते. हे आपल्या त्वचेला दिवसभराच्या तणावापासून मुक्त होण्यासाठी नैसर्गिकरीत्या त्वचेला या चक्रातून जाऊ देतं. जर आपल्याला आवश्यक सौंदर्यवर्धक झोप मिळत नसेल तर आपण या चक्रात व्यत्यय आणत आहात. कॉर्टिसॉलचे उच्च स्तर कॉलेजन तोडून सुरकुत्या वाढवतात.

**प्रदूषण :** आपल्या सर्वांसाठी प्रदूषणाची वाढती पातळी वाईट आहे, हे तर सर्वांनाच माहीत आहे. धूर, धूळ आणि धुकं यापासून त्वचेच्या फ्री रॅडिकल्सला नुकसान होतं. यामुळे अकाली वृद्धत्व आणि सुरकुत्या येऊ लागतात. नकारात्मक प्रभावाला कमी करण्यासाठी दिवसाच्या शेवटी आपल्या चेहऱ्याला स्वच्छ करावे.

**आपली झोपण्याची स्थिती :** जर आपल्याला पोटावर किंवा हाताला उशीखाली दाबून झोपण्याची सवय असल्यास, बराच काळ असे केल्यानं आपल्या चेहऱ्यावर काही डाग येऊ शकतात. याचा परिणाम रात्रभर दिसून येत नाही, पण नंतर लक्षात येतो. यापासून वाचण्यासाठी पाठीवर झोपण्याचा प्रयत्न करा आणि त्वचेच्या सुरकुत्यांना कमी करण्यासाठी रेशीम किंवा सॅटिनची उशी वापरा.

**उच्च साखरयुक्त आहार घेणं :** साखर आपले वजन वाढवण्यात आणि त्वचेला अकाली वृद्ध करण्यात योगदान देते. साखर विरघळल्यावर ही ग्लायकेशन नावाच्या प्रक्रियेतून जाते. मुळात, ही कॉलेजन आणि इलॅस्टीनला बांधते आणि त्यांना कमकुवत करते. यामुळे फाईन लाइन्स आणि सुरकुत्या दिसून येतात.

**सनस्क्रीन न लावणं :** सूर्यापासून निघणारे यूव्ही किरण आपल्या त्वचेवरील सुरकुत्यांसाठी सर्वात जास्त जबाबदार असतात. असुरक्षित असणाऱ्या अल्ट्राव्हायोलेट प्रकाशाच्या संपर्कात येऊन कॉलेजन खराब होऊ शकतं, ज्यामुळे फाईन लाइन्स आणि सुरकुत्या होऊ शकतात. म्हणून आपल्या त्वचेला वाचवण्यासाठी नेहमी सनस्क्रीन वापरा.

**डिहायड्रेड त्वचा :** आपल्या त्वचेला सुरकुत्यांपासून वाचवण्यासाठी नेहमी हायल्युरोनिक ॲसिड असणाऱ्या उत्पादनांचा वापर करावा. हे आपल्या त्वचेतील ओलावा टिकवून ठेवते, ज्यामुळे डोळ्याच्या भोवती बनणाऱ्या फाईन लाइन्स कमी होतील. तसेच स्वतःलादेखील आतून हायड्रेट ठेवा. दिवसभरातून किमान ८ ग्लास पाणी पिण्याचा नियम बनवा.



**प्रत्येक व्यक्तीला दररोज पुरेशी विश्रांती मिळणे आवश्यक असते. व्यक्तीनुसार झोपेचे प्रमाण बदलत असले तरीही चांगल्या आरोग्यासाठी किमान सात तासांची झोप घेणे आवश्यक असते. ही झोप सलग असली पाहिजे. झोपेमध्ये खंड पडला तर शरीराला त्याचा फारसा उपयोग होत नाही. अनेकांना रात्री जागरण करण्याची सवय असते. मात्र, ही सवय कालांतराने आरोग्यासाठी घातक ठरू शकते. झोप पूर्ण झाली नाही तर व्यक्तीच्या शरीरावर प्रतिकूल परिणाम होऊ शकतात. अपुऱ्या झोपेमुळे उद्भवणारी काही लक्षणे पाहूयात...**

# अपुऱ्या झोपेमुळे होतात हे त्रास

■ **भावनिक अस्वस्थता :** पुरेशी झोप न झाल्यामुळे व्यक्ती विनाकारण चिडचिड करते. बऱ्याच काळापासून शरीराला आवश्यक असणारी विश्रांती मिळाली नाही तर त्याचा परिणाम व्यक्तीच्या भावनांवर होतो. त्यामुळे व्यक्तीचा मूड सातत्याने बदलत राहतो.

■ **विसरभोळेपणा :** योग्य तितकी झोप न झाल्यास व्यक्तीमध्ये विसरभोळेपणा वाढतो. याचे प्रमाण काही वेळा इतके वाढते की अगदी काही काळापूर्वी तुम्ही केलेली गोष्टही तुम्हाला सहज आठवेनाशी होते.

■ **नवीन गोष्टी शिकण्यात अडथळे :** अपुरी झोप ही तुमच्या स्मरणशक्तीवर परिणाम करते. झोप झाली नसल्यास मेंदूला जास्त ताण द्यावा लागतो आणि त्यामुळे नवीन गोष्टी शिकण्यात अडथळे निर्माण होण्याची शक्यता असते.

■ **अकाली वृद्धत्व :** आपण लवकर वयस्कर व्हावे असे कोणत्याच व्यक्तीला वाटत नाही. मात्र पुरेशी झोप न झालेल्या व्यक्तींच्या त्वचेवर लवकर सुरकुत्या पडतात. त्यामुळे व्यक्ती वयस्कर दिसू लागतात.

■ **लठ्ठपणा :** पुरेशी झोप न झालेल्या व्यक्तींचे शारीरिक गणित बिघडते. अन्नाचे योग्य प्रकारे पचन होत नाही. तसेच त्यांना वारंवार भूक लागण्याचीही शक्यता असते. त्यामुळे लठ्ठपणा वाढू शकतो.

■ **कर्करोग होण्याची शक्यता :** अपुऱ्या झोपेमुळे आपल्या शरीराचे नव्हे तर मेंदूचे कार्यही बिघडते. अपुरी झोप ही प्रोस्टेट कर्करोग, स्तनांचा कर्करोग यांसारख्या आजारांना कारणीभूत ठरू शकते.

■ **कमी प्रतिकारशक्ती :** अपऱ्या झोपेमुळे शरीरातील प्रतिकारशक्ती कमी होऊ शकते. त्यामुळे अशा लोकांना संसर्गजन्य आजार होण्याची शक्यता जास्त असते.




# इन्स्टाग्रामवरून करायचा आहे का व्हिडीओ कॉल, मग फॉलो करा या स्टेप्स

**इन्स्टाग्रामवर व्हिडीओ कॉलिंग हे जबरदस्त फीचर जोडण्यात आलं आहे. याच्या माध्यमातून तुम्ही व्हिडीओ कॉल करून तुमच्या मित्रांशी संवाद साधू शकता.**

इन्स्टाग्राम आपल्या कंटेंट आणि फीचर्सच्या जोरावर सध्या एक लोकप्रिय सोशल मीडिया प्लॅटफॉर्म बनलं आहे. या प्लॅटफॉर्मवर फोटो आणि व्हिडीओ शेअर करण्यासोबतच व्हिडीओ कॉलदेखील करता येतो. जर तुम्हालादेखील हे फीचर वापरायचं असेल आणि जर तुम्हाला पद्धत माहीत नसेल तर टेंशन घेऊ नका. आम्ही तुम्हाला या आर्टिकलमध्ये व्हिडीओ कॉल करण्याची पद्धत सांगणार आहोत, ज्यामुळे तुम्ही तुमच्या मित्र-मैत्रिणींशी फेस-टू-फेस संवाद साधू शकता.

## इन्स्टाग्राममध्ये अशाप्रकारे करा व्हिडीओ कॉल



- तुमच्या मोबाईलमध्ये इन्स्टाग्राम ॲप ओपन करा.
- उजवीकडे असलेल्या मेसेज आयकॉनवर क्लिक करा.
- चॅट लिस्टमधून तो कॉण्टॅक्ट निवडा, ज्याला तुम्हाला व्हिडीओ कॉल करायचा आहे.
- त्यानंतर उजवीकडे असलेल्या कॅमेरा आयकॉनवर क्लिक करा.
- त्यानंतर व्हिडीओ कॉल सुरू होईल.
- अशाप्रकारे तुम्ही व्हिडीओ कॉलच्या माध्यमातून तुमच्या मित्र-मैत्रिणींशी बोलू शकता.

व्हिडीओ कॉल दरम्यान तुम्ही काय करू शकता...

- व्हिडीओ कॉलदरम्यान तुम्ही फोनचा कॅमेरा स्विच करू शकता.
- मायक्रोफोन आयकॉनवर क्लिक करून तुम्ही माइक म्यूट करू शकता.
- स्माइली फेस आयकॉनवर टॅप करून तुम्ही व्हिडीओ कॉलमध्ये इफेक्ट ॲड करू शकता.

लक्षात असू द्या व्हिडीओ कॉल करण्यापूर्वी वाय-फाय किंवा डेटा कनेक्शन सुरळीत असेल याची काळजी घ्या. ज्यामुळे तुम्ही अगदी सहज व्हिडीओ कॉलिंग करू शकाल. तसेच तुम्हाला व्हिडीओ क्वालिटीदेखील चांगली मिळेल. विशेष म्हणजे कॉलिंग दरम्यान तुम्ही ४ लोकांना जोडू शकता आणि चार लोकांशी एकाचवेळी बोलू शकता. महत्त्वाची बाब म्हणजे ज्यांना व्हिडीओ कॉल करायचा आहे, त्यांनी इन्स्टाग्राम नोटिफिकेशन ऑन केलेल्या असाव्यात, तसेच ते ऑफलाइन असल्यास व्हिडीओ कॉल नोटिफिकेशन त्यांना जाणार नाहीत. सोशल मीडिया ॲप इन्स्टाग्रामनं गेल्या वर्षी किशोरवयीन मुलांचा विचार करून नाइट टाइम नज फीचर लाँच केलं होतं. ही सुविधा रिमाइंडरप्रमाणे चालते. जेव्हा किशोरवयीन मुलं ॲपवर १० मिनिटांपेक्षा वेळ घालवतील तेव्हा त्यांना ॲप बंद करण्याचा रिमाइंडर मिळेल.

# पोटाचा घेर कमी करायचा आहे? मग जाणून घ्या घोसाळी खाण्याचे फायदे

**गौरी**-गणपतीसारखे सण, उत्सव आले की अनेक घरांमध्ये घोसाळ्याच्या भज्यांचा वास घमघमू लागतो. साधारणपणे आपल्याला कांदाभजी, बटाटाभजी, पालकभजी असे भज्यांचे प्रकार माहीत आहेत. मात्र, या सगळ्यांमध्ये घोसाळ्याची भजीदेखील तितकीच खुमासदार लागतात. बऱ्याच वेळा घोसाळ्याची भजी खाण्यासाठी लोक नाकं मुरडतात. मात्र, घोसाळ्याची भजी किंवा भाजी खाण्याचे अनेक फायदे आहेत. मुळात घोसाळं हे शरीरासाठी अत्यंत गुणकारी आहे. त्यामुळे त्याचे नेमके फायदे कोणते ते जाणून घेऊयात.



■ लघवी साफ होते.

■ कफ झाल्यास घोसाळ्याचा रस प्यावा. त्यामुळे उलटी होऊन कफ बाहेर पडतो.

■ पोट साफ होतं. ■ जखम बरी होते. ■ पोटाचा घेर कमी होतो. ■ मूतखड्यावर गुणकारी

■ थकवा दूर होतो.

## टास्क फोर्सचे उद्देश

- शेतकऱ्यांच्या आत्महत्येस कारणीभूत ठरणाऱ्या घटकांचा अभ्यास आणि संशोधन
- हवामान बदलामुळे शेतीवर होणाऱ्या परिणामांचा आढावा घेऊन त्यावर उपाययोजना सुचविणे
- शेतकरी आत्महत्या प्रतिबंधासाठी धोरणात्मक उपयोजना
- शेतीचे तंत्रज्ञान, आर्थिक साहाय्य, सामाजिक आधार आणि मानसिक आरोग्यावर आधारित एकात्मिक पद्धती विकसित करणे
- आपत्तीपूर्व तयारी, आपत्तीच्या काळातील तातडीच्या उपाययोजना आणि आपत्तीनंतरच्या पुनर्वसनासाठी विशेष कृती कार्यक्रमाची निर्मिती
- विभागीय आणि जिल्हास्तरावरील अंमलबजावणीसाठी कृती आराखडा तयार करणे
- विविध शासकीय, निमशासकीय आणि स्वयंसेवी संस्थांशी समन्वय साधणे.
- शेतकऱ्याला कशा पद्धतीने अधिक सक्षम करता येईल या पद्धतीने प्रयत्न

# शेतकऱ्यांसाठी राज्य सरकारचा मोठा निर्णय

## शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी टास्क फोर्सची स्थापना, महाराष्ट्र ठरले पहिले

**■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

राज्यातील शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी तसेच हवामान बदलामुळे निर्माण होणाऱ्या आपत्तींच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या मानसिक, सामाजिक व आर्थिक समस्यांवर प्रभावी उपाययोजना राबवण्यासाठी महाराष्ट्र शासनाने कृषी विभागांतर्गत राज्यस्तरीय टास्क फोर्स स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे.

या टास्क फोर्सवर शेतकऱ्यांच्या मानसिक आरोग्य क्षेत्रात मागील दहा वर्षांपासून कार्यरत असलेले कृषी धोरणातील तज्ञ संशोधक, कृषी समाजशास्त्र डॉ. विनायक हेगाणा यांची विशेष सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. कृषी आयुक्त सूरज मांढरे यांच्याकडून जारी करण्यात आलेल्या शासन परिपत्रकानुसार, या टास्क फोर्सचे अध्यक्ष रफिक नाईकवाडी संचालक विस्तार प्रशिक्षण अध्यक्षतेखाली सुनील बोरकर, उदय देशमुख, गणेश घोरपडे, जीवन बुंदे, नंदकिशोर नाईनवाड, सत्यजित शितोळे, सोनाली शिळकर हे शासकीय सदस्य म्हणून तर सृष्टी डोईजड या अशासकीय सदस्य म्हणून आपले योगदान देणार आहेत. टास्क फोर्समार्फत शेतकरी आत्महत्यांची आर्थिक, सामाजिक व मानसिक कारणमीमांसा, हवामान बदलांचे परिणाम, अल्पकालीन व दीर्घकालीन धोरणात्मक उपाय, तसेच एकात्मिक हस्तक्षेप मॉडेल विकसित करण्यावर भर देण्यात येणार आहे.

डॉ. विनायक हेगाणा हे शेतकऱ्यांच्या मानसिक आरोग्यासाठी विकसित करण्यात आलेल्या ह्यपिरॅमिड मॉडेल चे जनक असून त्यांनी शिवार संसद आणि ह्यशिवार हेल्पलाइन सारख्या उपक्रमांद्वारे आतापर्यंत 2498 शेतकऱ्यांना आत्महत्येपासून परावृत्त केले आहे. आत्महत्याग्रस्त कुटुंबांतील महिलांच्या आर्थिक स्वावलंबनासाठीही त्यांनी उल्लेखनीय कार्य केले आहे. नुकतेच,डॉ. हेगाणा यांना त्यांच्या कायार्साठी डंस्टर बिझनेस स्कूल, स्वित्झर्लंड येथून सार्वजनिक आरोग्य क्षेत्रातील मानद डॉक्टरेट प्रदान करण्यात आली असून,



ते हा सन्मान मिळवणारे देशातील पहिले कृषी पदवीधर संशोधक ठरले आहेत.

याशिवाय, ब्रिटिश सरकारच्या प्रतिष्ठेच्या चेव्हनिंग ग्लोबल पुरस्कारानेही त्यांना गौरविण्यात आले आहे. या नियुक्तीबाबत बोलताना डॉ. हेगाणा म्हणाले, ह्लशासनाने कृषी आयुक्त सुरज मांढरे यांच्या मार्गदर्शनाखाली दिलेली ही जबाबदारी शेतकऱ्यांच्या मानसिक आरोग्यासाठी धोरणात्मक पातळीवर काम करण्याची मोठी संधी आहे. या माध्यमातून शेतकऱ्यांसाठी शाश्वत व प्रभावी मॉडेल उभे करता येईल. राज्यस्तरीय टास्क फोर्सच्या स्थापनेमुळे शेतकरी आत्महत्या प्रतिबंधासाठी समन्वयित, वैज्ञानिक आणि मानवी दृष्टिकोनातून उपाययोजना राबवण्यास गती मिळणार असल्याची अपेक्षा तज्ञांकडून व्यक्त केली जात आहे.

शेतकरी आत्महत्या हा केवळ आत्महत्येनंतर नुकसानभरपाई देण्याचा विषय नाही. शेतकऱ्याला कशा पद्धतीने अधिक सक्षम करता येईल, या दृष्टीनेही या विषयाकडे पाहणे गरजेचे आहे. त्यासाठी कृषी विभागातील सर्व योजना, उपक्रम यांची समन्वय इतर विभागांशी घालून अधिकाधिक प्रभावी पद्धतीने उत्पादन वाढीसोबतच उत्पन्न वाढीसाठीही प्रयत्न करणे शक्य व्हावे म्हणून हा टास्क फोर्स तयार करण्यात आला आहे.

शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी अनेक समित्यांनी उपाययोजना सुचवल्या, अभ्यास केला. या सर्वांचा अभ्यास आणि बदलत्या काळानुसार गरजेच्या उपाययोजना अधिक व्यापक पद्धतीने राबविण्यासाठी काम करण्यात येणार आहे असे मत कृषी विभागाचे विस्तार आणि प्रशिक्षण, संचालक रफिक नाईकवडी यांनी म्हटले आहे.

आतापर्यंत शिवार संसद आणि शिवार हेल्पलाइन द्वारे अडीच हजार शेतकऱ्यांना आत्महत्येपासून परावृत्त केले. आता या कृतिदलात शेतकऱ्यांच्या मानसिक आरोग्यासाठी धोरणात्मक पातळीवर काम करण्याची संधी मिळाली आहे. या माध्यमातून शेतकऱ्यांसाठी शाश्वत, वैज्ञानिक आणि मानवी दृष्टिकोनातून प्रभावी मॉडेल उभे करता येईल. तसेच शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठीच्या उपाययोजनांना गती मिळेल असे मत टास्क फोर्सचे सदस्य डॉ. विनायक हेगाणा यांनी व्यक्त केले.

# एअर इंडिया विमानाचा अपघात जाणूनबुजून घडवला!

**■मुंबई। प्रतिनिधी,**

गुजरातच्या अहमदाबादमध्ये झालेल्या एअर इंडिया फ्लाइट क्रॅशच्या तपासादरम्यान महत्त्वाची अपडेट समोर आली आहे. हा अपघात कोणत्याही तांत्रिक बिघाडामुळे झाला नसून, जाणूनबुजून केलेल्या कृत्यामुळे झाल्याचा निष्कर्ष तपासकर्त्यांनी काढला आहे. इटालियन दैनिक वृत्तपत्र Corriere della Sera यांनी नवी दिल्ली आणि वॉशिंग्टनमधील चर्चेशी परिचित असलेल्या दोन सूत्रांचा हवाला देत हे वृत्त दिल्याची माहिती आहे.

वृत्तानुसार, भारतीय तपासकर्त्यांनी असा निष्कर्ष काढला आहे की १२ जून २०२५ रोजी इंजिनमध्ये इंधनाचा पुरवठा बंद पडल्यानंतर झालेला अपघात यांत्रिक बिघाडामुळे नव्हता तर जाणीवपूर्वक केलेल्या कृतीमुळे झाला होता. अधिकारी




**वृत्तानुसार, ब्लॅक बॉक्स डेडाच्या आधारे सुरुवातीच्या टेक्निकल असेसमेंटमध्ये मॅकेनिकल बिघाड झाल्याचं नाकारण्यात आलं आणि त्याऐवजी इंजिन इग्निशन आणि शटडाउन नियंत्रित करणाऱ्या स्विचच्या मॅन्युअल हालचालीकडे लक्ष वेधण्यात आलं. तसेच, विमान क्रॅशच्या वेळी प्लेनचे दोन्ही इंजिन बंद झाल्याचं समोर आलं.**

आता आपल्या अंतिम अहवालाचा ड्राफ्ट बनवण्याच्या तयारीत आहेत. वृत्तपत्राने पुढे म्हटलं आहे की, तपासात मदत करणाऱ्या अमेरिकन तज्ज्ञांनी या निष्कषार्ला मोठं यश असल्याचं म्हटलं आहे.

एअर इंडियाचा बोइंग ७८७ ड्रीमलाइनर, अहमदाबाद विमानतळावरून उड्डाण घेतल्यानंतर काही सेकंदांनी क्रॅश झाला. या अपघातात एकूण २६० लोकांचा मृत्यू झाला असून त्यात प्रवासी आणि वैद्यकीय विद्यार्थ्यांच्या वसतिगृहात उपस्थित असलेल्या लोकांचा देखील समावेश होता. या दुर्घटनेत केवळ एका प्रवाशाचा सुदैवाने जीव वाचला.

जुलै २०२५ मध्ये भारताच्या विमान अपघात तपास ब्युरो (अअक्ष) ने प्रसिद्ध केलेल्या प्राथमिक अहवालात पायलटने फ्यूल कंट्रोल बंद केल्याबद्दलच्या शेवटच्या कॉकपिट संभाषणाचा उल्लेख केला होता. कॉकपिट व्हॉइस रेकॉर्डिंगमध्ये ऐकू आलं की, एका पायलटने विचारले, "फ्यूएल का बंद केलं?" तर दुसऱ्याने उत्तर दिले, "मी नाही केलं."

**इंजिन फ्यूएल कंट्रोल स्विच बंद केल्याचा दावा**

तपासकर्त्यांच्या म्हणण्यानुसार, त्या दोन्ही पायलट्सपैकी एकाने इंजिन फ्यूएल कंट्रोल स्विच बंद केलं होतं आणि त्यामुळे एअरक्राफ्टची पावर गेल्याने ते जमिनीवर कोसळल्याचा दावा रिपोर्ट्समध्ये करण्यात आला. कॅप्टन सुमीत सभरवाल हे पायलट-इन-कमांड होते, तर फर्स्ट ऑफिसर क्लाईव्ह कुंदर हे को-पायलट होते. नव्या रिपोर्टनुसार, ''जबाबदारी अद्याप स्पष्ट नाही. मुख्य संशयित कॅप्टन सुमित सभरवाल असून ते अपघातानंतर नैराश्याने ग्रस्त असल्याचं आढळून आलं.'' अअक्ष च्या सुरुवातीच्या तपासानंतर, सभरवालच्या वडिलांनी आपल्या मुलावरील सर्व आरोप फेटाळून लावले असून नव्या तपासाची मागणी केली आहे. तसेच, त्यांनी त्यांच्या मुलाच्या मानसिक आरोग्याबद्दलचे आरोप देखील फेटाळून लावले. घटस्फोटासह वैयक्तिक समस्यांमुळे संशयित पायलट नैराश्यात असल्याच्या म्हणण्याला कॅप्टन सुमित यांच्या वडिलांनी स्पष्टपणे नकार दिला.

# ‘गिल्बर्ट हिल नियम उल्लंघन प्रकरणी अहवाल सादर करा’

**■मुंबई । प्रतिनिधी,**

गिल्बर्ट हिल हा परिसर पर्यावरणाच्या दृष्टीने अत्यंत संवेदनशील व महत्त्वपूर्ण आहे. हा भाग हरित क्षेत्रात मोडत असून, येथे प्रकल्प विकसित करताना नियमांचे उल्लंघन झाल्याच्या अनुषंगाने संबंधित सर्व विभागांनी समन्वय साधून वस्तुस्थितीची माहिती घेऊन कार्यवाही करावी, अहवाल सादर करावा, असे निर्देश पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांनी दिले. मंत्रालयात त्यांच्या अध्यक्षतेखाली यासंदर्भात आढावा बैठक झाली. बैठकीस पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या सचिव जयश्री भोज तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका, महसूल विभाग, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या की, अंधेरी पश्चिम येथील गिल्बर्ट हिल परिसरात अनधिकृत बांधकाम झाल्याच्या तक्रारीच्या पार्श्वभूमीवर हा



भाग हरित क्षेत्रात मोडत असून आवश्यक परवानग्या व नियमांची पूर्तता अनिवार्य आहे.

या दृष्टीने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, बृहन्मुंबई महानगरपालिका, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण आणि संबंधित विभागांनी एकत्रित पाहणी करुन कार्यवाही करण्याची आवश्यकता आहे, असे निर्देश त्यांनी दिले.

# १५० पोलीस, सर्व रस्ते बंद अन्...

## पुण्यात रात्री १२ ते पहाटे ३ दरम्यान काय घडलं?



**ऑपरेशनचा मुख्य हेतू काय होता?**

या धडक मोहिमेमागे पोलिसांचे तीन मुख्य उद्दिष्ट होते. ज्या अल्पवयीन मुलींना जबरदस्तीने किंवा फसवणूक करून वेश्याव्यवसायात ढकलणाऱ्या दलालांचा शोध घेणे, वस्तीमध्ये छुप्या पद्धतीने चालणाऱ्या अमली पदार्थांच्या विक्रीला आळा घालणे, बनावट कागदपत्रांच्या आधारे बेकायदा राहणाऱ्या परदेशी नागरिकांची (प्रामुख्याने बांगलादेशी) ओळख पटवणे, असे तीन मुख्य उद्देश होते.

**■पुणे। प्रतिनिधी,**

पुण्यातील बुधवार पेठ या वेश्यावस्तीत बुधवारी मध्यरात्री पुणे पोलिसांनी एकाच वेळी धडक कारवाई केली. त्यामुळे संपूर्ण परिसराची नाकाबंदी करण्यात आली होती.

रात्री १२ वाजता सुरू झालेली ही मोहीम पहाटे ३ वाजेपर्यंत सुरु होती. गुन्हे शाखेचे अधिकारी, स्थानिक पोलीस आणि महिला पोलिसांचा मोठा फौजफाटा अचानक गल्लीबोळांत शिरल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. यावेळी ५० हून अधिक कुंटणखान्यांची झडती घेत पोलिसांनी संशयितांची कसून चौकशी केली.

**निलंबनाच्या कारवाईनंतर पोलीस आक्रमक**

काही दिवसांपूर्वी फरासखाना पोलीस ठाण्यातील एका महिला पोलीस कर्मचाऱ्याने एका बांगलादेशी तरुणीला वाचवण्यासाठी पैशांची देवाणघेवाण केल्याचा आणि वरिष्ठांपासून माहिती लपवल्याचा प्रकार समोर आला होता. या प्रकरणात त्या कर्मचाऱ्याचे निलंबन करण्यात आले होते. यानंतर आता पुणे पोलीस आयुक्त आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांनी बुधवार पेठेतील अवैध प्रकारांना आळा घालण्यासाठी हे कॉम्बिंग ऑपरेशन आखले.

**गल्लीगल्लीत नाकाबंदी आणि सर्च मोहीम**

रात्री १२ च्या सुमारास गुन्हे शाखेच्या विविध पथकांनी बुधवार पेठेला चारही बाजूंनी वेढा घातला. बुधवार पेठेत येणारे आणि जाणारे सर्व रस्ते बॅरिकेड्स लावून बंद करण्यात आले. प्रत्येक दुचाकी आणि संशयित व्यक्तीची तपासणी करण्यात आली. पोलिसांनी या कारवाईत ५० पेक्षा अधिक संशयित घरे आणि कुंटणखान्यांच्या खोल्यांची तपासणी केली. यात प्रामुख्याने मानवी तस्करी आणि अमली पदार्थांच्या साठ्याबाबत शोध घेण्यात आला. तसेच परिसरात विनाकारण वावरणाऱ्या आणि संशयास्पद हालचाली करणाऱ्या तरुणांची अंगझडती घेण्यात आली.

**शुक्रवार पेठ चौकीजवळ सखोल चौकशी**

याप्रकरणी शुक्रवार पेठ पोलीस चौकीच्या आसपास असलेल्या संवेदनशील भागात महिला पोलिसांनी कुंटणखान्यातील महिलांशी संवाद साधून त्यांच्याकडून माहिती गोळा केली. या मोहिमेत गुन्हे शाखेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसह स्थानिक पोलीस ठाण्याचे निरीक्षक आणि सुमारे १५० हून अधिक पोलीस कर्मचारी सहभागी झाले होते.

# छत्रपती संभाजीनगरमध्ये मंडप सजलेला, अल्पवयीन नवरीची मेकअपची तयारी अन्...

## बालविवाह रोखण्याचा थरार

**■छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी,**

काही बोलावं, कसं सांगावं? असा प्रश्न आता उपस्थित होतोय. कारण छत्रपती संभाजीनगरमध्ये एका अल्पवयीन मुलीचा विवाह केला जात होता. पोलिसांनी वेळीच हे लग्न रोखल्याने मुलीचं आयुष्य सुधारलं आहे. पण हे लग्न करण्यामागे मुलीच्या आईने तिच्या सुरक्षेचं कारण सांगितलं आहे. आपण धुणी-भांडी करायला जातो. घरी कुणी पुरुष नाही. आपण कामावर गेल्यावर मुलगी घरी एकटी कशी राहणार? अशा विचारातून आपण मुलीचं लग्न लावत असल्याचं महिलेने म्हटलं.

पण पोलीस आणि दामिनी पथकाने अल्पवयीन मुलीचं लवकर लग्न केल्याने तिच्या आयुष्यावर किती वाईट परिणाम होणार, याबाबत माहिती दिली. पोलीस आणि दामिनी पथकाच्या धाडीमुळे बालविवाह रोखण्यात आला.

**नेमकं प्रकरण काय?**

**पोलीस आणि समितीने दिले अभय...**

महिला व बालविकास समितीच्या आम्रपाली बोर्डे यांनी पालकांचे लेखी जबाब घेतले. मुलीचे वय पूर्ण झाल्याशिवाय लग्न करणे हा केवळ कायद्याने गुन्हाच नाही, तर मुलीच्या आरोग्यासाठीही घातक असल्याचे त्यांना पटवून देण्यात आले. दामिनी पथकाने दोन्ही कुटुंबांचे समुपदेशन करून त्यांना कडक समज दिली. दहावीत शिकणाऱ्या त्या मुलीला आता बालविवाहाच्या बेडीतून मुक्त करून पुन्हा शिक्षणाच्या प्रवाहात आणले जाणार आहे.



बीड बायपास रोडवरील शुभम लॉन्स येथे आज १२ फेब्रुवारीला एका विवाह सोहळ्याची जय्यत तयारी सुरू होती. मंडप सजला होता, पाहुण्यांची लगबग सुरू होती आणि नवरी मुलगी लग्नासाठी नटून-थटून तयार होती. तिचा मेकअप सुरू असतानाच, महिला व बालविकास समितीच्या सदस्य आम्रपाली बोर्डे यांना या विवाहाबद्दल खात्रीशीर माहिती मिळाली. त्यांनी तातडीने दामिनी पथकाच्या पोलीस उपनिरीक्षक कांचन मिरधे यांना पाचारण केले.

**मांडवात पोलीस पोहोचले अन्...**

कांचन मिरधे यांच्या मार्गदर्शनाखाली हेड कॉन्स्टेबल निर्मला निंभोरे, कविता गवळी, मोनिका दिवे, सुनिता नागलोद आणि बीट मार्शलचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी नवरी मुलीचे आधार कार्ड तपासले असता सर्वांनाच धक्का बसला. नवरी मुलगी केवळ १७ वर्ष ६ महिन्यांची असल्याचे निष्पन्न झाले. अवघ्या सहा महिन्यांनंतर ती सज्ञान होणार होती, मात्र त्याआधीच तिच्यावर संसाराचं ओझं टाकलं जात होतं.

**असुरक्षिततेच्या भीतीपोटी लग्नाचा घाट....**

मुलीच्या आईने आपली भूमिका मांडताना सांगितले की, त्या मुंबईत धुणी-भांडी करून उदरनिर्वाह करतात. घरात पुरुष माणूस नसल्याने आणि कामाच्या निमित्ताने घराबाहेर राहावे लागत असल्याने, मुंबईसारख्या ठिकाणी मुलीला एकटे सोडणे त्यांना सुरक्षित वाटत नव्हते. याच भीतीपोटी त्यांनी संभाजीनगरमधील एका २२ वर्षीय रिक्षाचालक मुलाशी तिचे लग्न ठरवले होते. लग्नासाठी सर्व तयारी झाली होती, आहेराची भांडीकुंडी लावली होती, मात्र कायद्याच्या सतर्कतेने हा अनर्थ टळला.

# जावयाने सासूवर लैंगिक अत्याचार करत घरातच संपवलं...

**■मुंबई । प्रतिनिधी,**

जावयानेच आपल्याच सासूवर लैंगिक अत्याचार केले आणि नंतर तिचा खून केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. मुलीने आपल्याच नवऱ्याविरुद्ध पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीच्या आधारे पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेत प्रकरणाचा तपास सुरु केला. या प्रकरणी आरोपीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीने दारूच्या नशेतच असे कृत्य केलं असावं अशी माहिती समोर आली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना 8 फेब्रुवारी रोजी रात्री कुलावर्ती मंडल येथे घडली. हा प्रकार घडला तेव्हा वृद्ध महिला घरात एकटीच होती. आरोपीची पत्नी आणि पीडित मुलीने दाखल केलेल्या तक्रारीत म्हटलं की, सुमारे 40 वर्षांचा आरोपी हा कामगार आणि मद्यपी आहे. तक्रारीनुसार त्याने त्याच्या सासूवर घरातच लैंगिक अत्याचार केला आणि नंतर तिला संपवलं.

**मृत्यूचे नेमकं कारण काय? तपास सुरु**

संबंधित प्रकरणात पोलीस अधिकाऱ्याने सांगितलं की, आरोपीने वृद्ध महिलेवर हल्ला केला असावा, ज्यात तिचा दुर्दैवी मृत्यू झाल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. मृत्यूचे नेमकं कारण काय याचा तपास सुरु आहे. नंतर पोलिसांनी असं देखील सांगितलं की, आरोपीने दारूच्या नशेत असताना हा गुन्हा केल्याची शक्यता आहे. तक्रारीच्या आधारे, कुलवाकुर्ती पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आणि आरोपीला ताब्यात घेण्यात आले.

# आधी प्रेयसीला संपवलं अन् मग तिच्याच ओढणीने गळफास घेतला




**■मुंबई । प्रतिनिधी,**

एका तरुणाने आपल्या प्रेयसीची हत्या करुन स्वतःही आपले जीवन संपवले आहे. सुनील आणि सिमरन असे या मृत जोडप्याचे नाव आहे. सोमवारी (९ फेब्रुवारी) रात्री या दोघांनी एकत्र मद्यप्राशन केले होते. यानंतर या दोघांमध्ये कडाक्याचा वाद झाला. या वादानंतर सुनीलने सिमरनचा गळा दाबून खून केला आणि यानंतर सिमरनच्याच ओढणीने गळफास घेत आत्महत्या केली. सिमरनच्या गळ्यावर खुणा आढळल्याने तिची गळा दाबून हत्या करण्यात आली असावी, असा प्राथमिक अंदाज डॉक्टरांनी व्यक्त केला आहे. हरियाणातील सिरसा येथील ही घटना आहे.

# छत्रपती संभाजीनगर हादरलं... सहावीत शिकणाऱ्या चार विद्यार्थ्यांचा वर्गमित्रावर अत्याचार

**■छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी,**

अत्याचार करणाऱ्या चार मुलांवर शाळा प्रशासनाने कोणतीही कारवाई केली नाही, उलट तक्रार करणाऱ्या पीडित मुलावर दबाव आणल्याचा आरोप करण्यात येत आहे.

**त्रिस्तरीय समितीकडून चौकशी**

हे प्रकरण उघडकीस आल्यानंतर जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागानं त्रिसदस्यीय चौकशी समिती नेमून प्रकरणाची चौकशी सुरू केली. मात्र शाळेकडून संबंधित मुलांवर कोणतीही कारवाई केली नसल्याचा आरोप पीडित मुलाच्या वडिलांनी केला. उलट पीडित मुलावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप संबंधित मुलाच्या वडिलांनी केला. राज्याचे शिक्षणमंत्री दादा भुसेंनीही या प्रकरणाची गंभीर दखल घेत चौकशीचे आदेश दिले आहेत. दादा भुसे म्हणाले की, या संदर्भात मी स्वतः माहिती घेणार आहे आणि त्यावर योग्य ती करेन. शिक्षण विभागाने या प्रकरणाची गंभीर दखल घेतली असून यामध्ये हलगर्जीपणा करणाऱ्यांवर कारवाई करणार आहे.

छत्रपती संभाजीनगरमधील एका नामांकित इंग्रजी शाळेमध्ये चार मुलांनी त्यांच्याच वर्गमित्रावर लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. हे सर्व विद्यार्थी सहावीच्या वर्गात शिक्षण घेत आहेत. सप्टेंबर महिन्यामध्ये ही घटना घडल्याची माहिती पीडित मुलाच्या पालकांनी दिली. याप्रकरणी 4 मुलांविरोधात फुलंब्री पोलीस ठाण्यात पॉक्सोअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. तर जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने त्रिसदस्यीय चौकशी समिती नेमून प्रकरणाची चौकशी सुरू केली. दुसरीकडे, शाळेने मात्र संबंधित मुलांवर कोणतीही कारवाई केली नाही. उलट पालकांवरच दबाव आणल्याची माहिती समोर आली आहे.

छत्रपती संभाजीनगरच्या एका इंग्रजी माध्यमाच्या शाळेत घडलेला हा धक्कादायक प्रकार जेव्हा एबीपी माझानं समोर आणला तेव्हा अख्खा महाराष्ट्र हादरला. पीडित विद्यार्थी हा सहावीतला आहे आणि त्याच्याच वर्गातल्या विद्यार्थ्यांनी गेल्या वर्षी सप्टेंबर महिन्यात त्याच्यासोबत हे दुष्कृत्य केलं आहे.

**संगतीमुळे मुलं बिघडतात**

पण शाळकरी मुलांमध्ये अशा प्रकारची विकृत मानसिकता येते कुठून असा प्रश्न उपस्थित होत आहे. यावर मानसोपचार तज्ज्ञ किशोर शितोळे यांनी सांगितलं की, "मोबाईलचा अतिवापर, पॉर्न व्हिडीओ पाहणे, एका विशिष्ट विचारसरणीच्या मुलांच्या एकत्र ग्रुप होणे, अशा कारणामुळे या घटना घडू शकतात. यावर उपाय म्हणजे पालकाने विद्यार्थ्यांशी संवाद साधला पाहिजे."

सध्या आरोप असलेल्या चार अल्पवयीन मुलांवर पॉक्सोअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शाळेत घडणारे असे प्रकार भविष्यात थांबावेत यासाठी शाळा प्रशासन, शिक्षण विभाग काय कारवाई करणार हे पाहावं लागेल.



हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com